**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६०४/२०११.**

श्री. गणपती विठोबा धोबे,
साईनगर, वणी नाका,
ता. वरोरा, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपनिबंधक, सहकारी संस्था,
प्रशासकीय भवन,
मध्यवर्ती बस स्थानकाजवळ,
चंद्रपूर.

श्री. एस. पी. वनस्कर,
जनमाहिती अधिकारी तथा,
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
बाजार समिती नगर परिषद कार्यालय जवळ,
ता. वरोरा, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.८.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. डी. एच. रोहनकर, कार्यालयीन अधिक्षक - २ हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १८.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वरोरा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन उदय गृहनिर्माण

... २

सहकारी संस्थेच्या संदर्भात केलेल्या तक्रारीची चौकशी व ३० सभासदांचे बयानाच्या बाबत माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १३.१२.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध झाली. मात्र ३० सभासदांचे बयान त्यांना मिळाले नाही. म्हणून त्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर यांचेकडे प्रथम अपील दिनांक ७.२.२०१० रोजी दाखल केले. तथापी त्यांचे प्रथम अपील फेटाळण्यात आल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १८.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दिनांक ७.१२.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती अपीलकर्त्यास दिनांक १३.१२.२०१० च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. त्यामध्ये चौकशी अहवालाची प्रत उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी सांगितले. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणी मान्य केले. मात्र ३० सभासदांच्या बयानाची प्रत त्यांना मिळाली नाही असे त्यांनी नमुद केले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, चौकशीच्या वेळी असे दिसून आले की, सदरची संस्था ही सहकारी कायद्याखाली नोंद झाली नाही. त्यामुळे ३० सभासदांचे बयान घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तथापी चौकशीच्या अहवालाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचे निर्णयात असे नमुद केले आहे की, सदरची संस्था सहकारी कायद्याखाली नोंद झाली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयातून कोणतीही माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. या कारणास्तव प्रथम अपील फेटाळलेले आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १३.१२.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच त्यासोबत चौकशी अहवालाची प्रत देखील उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र सदरची संस्था सहकारी कायद्याखाली नोंदणी झाली नसल्यामुळे त्या संस्थेचे निबंधकाचे कार्यालयात कोणताही रेकॉड नाही. तथापी सह निबंधकांनी अपीलकर्त्यास चौकशीच्या अहवालाची प्रत उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे फेटाळण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-          दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६०६/२०११.

श्री. सुरेशकुमार रामप्रसादजी शुक्ला,
भऊआ कुटी, राष्ट्रसंत वार्ड,
ता. आर्वी, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
समादेशक,
राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ९,
ता. जि. अमरावती.

श्री. एस. एन. पाटील,
जनमाहिती अधिकारी तथा,
समादेशक सहाय्यक,
राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ९,
ता. जि. अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.८.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, अमरावती यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ५.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक ९, अमरावती यांचेकडे माहितीच्याअर्ज सादर करुन श्री. मोहन नारायण अजमिरे, राज्य राखीव पोलीस सैनिक बक्कल क्रमांक ११५० यांच्याबाबत दिनांक १.४.२००८ ते

... २

दिनांक ३०.८.२००८ या कालावधीत घेतलेल्या रजा व्यतिरिक्त दिनांक २०.५.२००८ रोजी मुख्यालय सोडण्याची मंजूरी दिल्याची माहिती मागितलेली होती. तसेच त्यांच्या सेवापुस्तकाची प्रथम पृष्ठाची प्रत त्याचप्रमाणे नियुक्ती आदेश व चारित्र्य पडताळणी अहवाल इत्यादी माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना दिनांक २५.३.२०१० च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांनी असे कळविले की, ज्या व्यक्तीची माहिती आपण मागितली आहे त्या व्यक्तीच्या नावात तफावत आहे. तसेच मागितलेली माहिती ही दुसऱ्या व्यक्तीची खाजगी/वैयक्तीक स्वरुपाची असल्याने माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील नियम क्रमांक ८(१)(ज) अन्वये देता येत नाही असे त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी कळविले. म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक २.६.२०१० रोजी समादेशक यांचेकडे दाखल केले. त्यानंतर दिनांक १६.७.२०१० च्या पत्राने माहिती मिळाली. परंतु ती फक्त रजेची माहिती त्यांना मिळाली. मात्र इतर माहिती त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा समादेशक सहाय्यक, राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक ९, अमरावती यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याच्या दिनांक ५.१.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १५.३.२०१० रोजी प्राप्त झाला. त्याला अनुसरुन दिनांक २५.३.२०१० च्या पत्राने त्यांना असे कळविले की, आपण ज्या व्यक्तिची माहिती मागितली त्या व्यक्तिच्या नावात तफावत आहे. कारण अपीलकर्त्याने मोहन नारायण अजमिरे यांची माहिती मागितलेली होती. तथापी यापदावर बक्कल क्रमांक ११५० राज्य राखीव पोलीस म्हणून श्री. धनंजय नारायण अजमिरे हे कार्यरत आहेत. म्हणून या नावात तफावत आहे. तसेच सदरची माहिती ही त्रयस्थ व्यक्तिशी संबंधीत असल्याने व ती खाजगी स्वरुपाची असल्याने ती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या नियम क्रमांक ८ प्रमाणे ती देता येत नाही असे अपीलकर्त्यास दिनांक २५.३.२०१० च्या पत्राने कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दा ाल केले व प्रथम अपीलानंतर अपीलकर्त्यास दिनांक १६.७.२०१० च्या पत्राने रजेची माहिती व श्री. धनंजय नारायण अजमिरे यांना दिनांक २०.५.२००८ रोजी कोणतीच रजा मंजूर करण्यात आली नाही ही देखील माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे माहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

४. दिनांक १६.७.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र सेवा पुस्तकाची प्रत, त्याच्या नेमणूकीच्या आदेशाची प्रत व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्राची प्रत इत्यादी माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांनी सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, सदरची माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने व त्रयस्थ पक्षाने सदरची माहिती अपीलकर्त्यास पुरवु नये असे लेखी दिल्यामुळे ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली नाही असे नमुद केले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास दिनांक १६.७.२०१० च्या पत्राने रजेची माहिती व दिनांक २०.५.२००८ रोजी कोणतीच रजा मंजूर करण्यात आली नाही किंवा श्री. धनंजय नारायण अजमिरे यांना मुख्यालय सोडण्याची परवानगी दिली नाही अशी माहिती उपलब्ध करुन दिली आहे. तथापी बक्कल नंबर ११५० पोलीस हवालदार श्री. धनंजय नारायण अजमिरे हे जनमाहिती अधिकारी यांचे आस्थापनेवर कार्यरत असल्यामुळे त्यांच्या सेवापुस्तकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत तसेच त्यांच्या नियुक्तीच्या आदेशाची प्रत व चारित्र्य प्रमाणपत्र पडताळणीची प्रत किंवा याबाबतच्या सेवा पुस्तकातील नोंदीची झेरॉक्स प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. कारण सदरची कागदपत्रे ही कार्यालयातील कागदपत्रे आहेत. ती कागदपत्रे गोपनीय स्वरुपाची दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पोलीस हवालदार, बक्कल नंबर ११५० श्री. धनंजय नारायण अजमिरे यांच्या सेवापुस्तकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत तसेच त्यांच्या नियुक्तीच्या आदेशाची प्रत व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्राची प्रत किंवा त्याबाबतच्या सेवापुस्तकातील नोंदीची प्रत अपीलकर्त्यास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावीत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७५७-७५९/१.८.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६१६/२०११.

श्री. श्रीराम फकीराजी भोगे,
गणेश वार्ड, ता. पवनी, जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. विनोद हरकंडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता.जि. भंडारा.

श्री. सुशील वैद्य,
जनमाहिती अधिकारी तथा,
तहसीलदार,
पवनी, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.८.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १०.२.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, पवनी यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन मौजा पवनी शेती गट नं. ५८२ मधील केंव्हा फेरफार झाला त्याची तारीख, फेरफार क्रमांक तसेच रायपूरकर बबन गोपाळा, वासुदेव गोपाळा, शंकर लक्ष्मण , नत्थु श्रावण हयांचा फेरफार पंजी मिळण्याबाबत माहिती मागितलेली होती. परंतु त्यांना त्यांचे अपेक्षेप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी उपविभागीय अधिकारी, भंडारा यांचेकडे प्रथम अपील दिनांक १७.३.२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील फेटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

... २

३. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १०.२.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मौजा पवनी येथील गट नं. ५८२ मधील फेरफार बाबत माहिती मागितलेली होती. तथापी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे निश्चित स्वरुपात बोध होत नव्हता तरी देखील त्या गट नंबर संबंधात तलाठीकडे उपलब्ध असलेल्या फेरफारच्या नोंदी अपीलकर्त्यास दिनांक २२.३.२०११ च्या पत्राने तलाठी यांचेकडून प्राप्त करुन पाठविल्या. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपविभागीय अधिकारी, भंडारा यांचेकडे दाखल केले. त्या अपीलाची सुनावणी ठेवण्यात आली. मात्र सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रथम अपील त्यांचे फेटाळण्यात आले. याबाबत अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांना प्रथम अपीलाचे सुनावणीची नोटीस प्राप्त झाली नसल्यामुळे ते प्रथम अपीलाचे सुनावणीस हजर राहिले नाही.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दिनांक १०.२.२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २२.३.२०११ च्या पत्राने तलाठीकडे उपलब्ध असलेली माहिती पाठविलेली आहे. तसेच आयोगासमोर देखील गट नं. ५८२ च्या संदर्भात झालेला फेरफार नोंदींची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यात आली. मात्र याबाबत अपीलकर्त्याने आयोगाकडे असे सांगितले की, त्यांना गट नं. ५८२ मध्ये जितके फेरफार नोंदी झालेल्या आहेत व त्या नोंदीमध्ये बबन गोपाळा, वासुदेव गोपाळा, यांच्या ६ फेरफार नोंदी आहेत. तसेच शंकर लक्ष्मण रायपूरकर यांच्या ११ फेरफार नोंदी आहेत. त्यासर्व नोंदीची माहिती त्यांना मिळणे आवश्यक आहे. याबाबत तहसीलदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता हे त्यांचे कार्यालयात उपस्थित झाल्यास त्यांना गट नं. ५८२ मधील झालेल्या सर्व नोंदीच्या कागदपत्रे निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात येतील व त्या निरिक्षणानंतर अपीलकर्त्यास पाहिजे असलेल्या नोंदी पुन्हा उपलब्ध करुन देणे शक्य होईल असे तहसीलदार यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून अपीलकर्ता यांनी तहसीलदार, पवनी यांचेकडे दिनांक ५.८.२०११ रोजी सकाळी ११:०० वाजता त्यांचे कार्यालयात उपस्थित राहावे व अपीलकर्ता त्यांचे कार्यालयात हजर झाल्यानंतर संबंधित तलाठीकडून गट नं. ५८२ च्या झालेल्या सर्व नोंदीची कागदपत्रे निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देऊन अपीलकर्त्यास पाहिजे असलेल्या नोंदी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांनी दिनांक ५.८.२०११ रोजी सकाळी ११:०० वाजता तहसीलदार, पवनी यांचे कार्यालयात हजर राहावे व अपीलकर्ता हजर झाल्यानंतर तहसीलदार, पवनी यांनी गट नं. ५८२ च्या संबंधित सर्व नोंदीच्या रेकॉर्ड संबंधित तलाठी यांचेकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावे व अपीलकर्त्याने रेकॉर्डचे निरिक्षण केल्यानंतर त्यांना पाहिजे असलेल्या प्रती उपलब्ध करुन द्याव्यात.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७६०-७६२/२.८.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६१७/२०११.**

श्री. शंकर मोतीराम वैद्य,
मु. कोसरा, पो. कोंढा कोसरा,
ता. पवनी, जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. विनोद हरकंडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता.जि. भंडारा.

श्री. सुशील वैद्य,
जनमाहिती अधिकारी तथा,
तहसीलदार,
पवनी, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.८.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ७.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, पवनी यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ ग्रामीण भागात बिनशेती परवानगी व बिनशेती सारा भरण्यातून सुट देण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक २२ मे २००७ अन्वये काढण्यात आलेले आहे. या परिपत्रकाप्रमाणे सारा भरण्याबाबत सुट देण्यात आली असून सुध्दा आपल्या कार्यालयातर्फे सारा वसूल करण्यात येत आहे याबाबत त्यांना माहिती पुरविण्यात यावी अशी त्यांनी मागणी केली

... २

होती. त्यांना जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, पवनी यांनी दिनांक २३.७.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली होती. त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी उपविभागीय अधिकारी, भंडारा यांचेकडे प्रथम अपील दिनांक २४.१.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपील त्यांचे फेटाळण्यात आल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ७.६.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता व अपीलकर्त्यास दिनांक २३.७.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली व त्या माहितीमध्ये असे नमुद केले की, दिनांक २२ मे २००७ शासनाचे परिपत्रकात नमुद केले आहे की, काही क्षेत्र वगळता ग्रामीण भागातील वैयक्तिक निवासी वापराखाली क्षेत्रासाठी अकृषक परवानगीची आवश्यकता नाही आणि ऐवढया पुरतीच ते मर्यादित आहे. मात्र ज्या ग्रामीण भागात वापर व बांधकाम विषयक इतर कायद्याचे जे नियमन/निर्बंध आहेत ते तसेच लागू राहणार आहेत. त्यामुळे या कार्यालयाकडून सारा भरण्यापासून सुट देण्याबाबत नियमाप्रमाणे सारा वसुल करण्यात येत आहे अशी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. त्याची सुनावणी घेण्यात आली. मात्र सुनावणीस अपीलकर्ता हजर राहिले नाही. म्हणून तहसीलदार यांनी माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे त्यांचे प्रथम अपील फेटाळण्यात आल्याचे उपविभागीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार यांनी अपीलकर्त्याच्या दिनांक ७.६.२०१० च्या माहिती अर्जाला अनसरुन दिनांक २३.७.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत मान्य केले. मात्र शासनाच्या दिनांक २२.५.२००७ च्या शासन निर्णयाप्रमाणे तलाठी स्तरावर कार्यवाही करण्याची सुचना निर्गमित

करण्यात याव्यात अशी त्यांनी मागणी केली. त्यावर उपविभागीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, शासनाकडील दिनांक २२.५.२००७ च्या शासन निर्णयाचे संदर्भात अंमलबजावणीसाठी योग्य त्या सुचना परिपत्रकात काढून संबंधितांना देण्यात येतील. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) उपविभागीय अधिकारी, भंडारा यांनी शासनाकडील वर नमुद केलेल्या दिनांक २२.५.२००७ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणीसाठी परिपत्रकीय सुचना निर्गमित करुन संबंधितांना पाठवावी व त्या परिपत्रकाची प्रत अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. सदरची कार्यवाही हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत करण्यात यावी.

.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७६३-७६५/२.८.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६१८/२०११, अपील क्रमांक ६१९/२०११ व अपील क्रमांक ६२०/२०११.

श्री. राजेश नवलकिशोर ठाकूर,
विशाखा निवास, अजयनगर,
अंबाझरी हिलटॉप, नागपूर - ४४० ०३३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन. डब्ल्यू. खंडाळ,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (कृषि पंचायत),
पंचायत समिती, हिंगणा, जि. नागपूर.

श्री. व्ही. एन. डेकाटे,
जनमाहिती अधिकारी तथा,
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत वडगांव (गुजर),
ता. हिंगणा, जि. नागपूर.

श्री. प्रविण देशमुख,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत)
पंचायत समिती, हिंगणा, जि. नागपूर.

श्रीमती सुशिला पु. भानसे,
जनमाहिती अधिकारी तथा,
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत मंगरुळ,
ता. हिंगणा, जि. नागपूर.

श्री. रमेश साळुंके,
जनमाहिती अधिकारी तथा,
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, गुमगांव,
ता. हिंगणा, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.८.२०११)**

... २

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये वर नमुद केल्याप्रमाणे तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. तीनही द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ता हे एकच आहेत व माहितीचा विषय हा देखील एकच आहे त्यामुळे तीनही अपीलांची ण्कत्रित सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. **<u>अपील क्रमांक ६१८/२०११</u> :-** याबाबत अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वडगांव गुंजर, ता. हिंगणा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन दिनांक १.१.२००९ ते दिनांक २९.१२.२०१० या कालावधीतील ग्रामपंचायत बाबत एकूण १३ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्याना ३० दिवसांत माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक ५.३.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २९.१२.२०१० चा माहितीचा अर्ज प्राप्त झाला होता. त्यावेळी ग्रामपंचायत मध्ये तत्कालीन ग्रामसेवक म्हणून कु. स्नेहा ठाकरे हया कार्यरत होत्या. त्यांनी अपीलकर्त्यास दिनांक २८.१.२०११ च्या पत्राने पोस्टाने माहिती उपलब्ध करुन दिली. त्याबाबतचा पोस्टाचा पुरावा विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे दाखविला त्यावरुन असे दिसून येते की, दिनांक २८.१.२०११ चे पत्र पोस्टाद्वारे पाठविल्याचे दिसून येते. सदरची माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्यानी सुनावणीत मान्य केले. मात्र सदरची माहिती ३० दिवसांनंतर त्यांना मिळाली म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. त्या सुनावणीच्या वेळी अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर होते. त्यावेळी असे दिसून आले की, जनमाहिती अधिकारी यांनी

... ३

अपीलकर्त्यास दिनांक २८.१.२०११ च्या पत्राने माहिती पाठविलेली आहे. मात्र पाठविलेल्या माहितीच्या संदर्भात संभ्रम असल्याने ग्रामपंचायत मध्ये येऊन त्यांनी खुलासा करावा असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले होते. म्हणून अपीलकर्त्याने प्रथम अपीलाचे सुनावणीचे वेळी संभ्रम असलेल्या माहितीबाबत खुलासा केला व जनमाहिती अधिकारी यांनी सदरची माहिती १५ दिवसांत अपीलकर्त्यास त्यांचेकडून माहितीचे शुल्क घेऊन माहिती उपलब्ध करुन द्यावी असा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचेकडील दिनांक २९.१२.२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक २८.१.२०११ च्या पत्राने पोस्टाद्वारे माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तथापी प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याकडून माहितीचे शुल्क भरुन घेऊन राहिलेली माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

५. **अपील क्रमांक ६१९/२०११** :- याबाबत अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मंगरुळ, ता. हिंगणा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन ग्रामपंचायत, हिंगणा बाबत एकूण १३ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक २०.२.२०११ रोजी विस्तार अधिकारी यांचेकडे दाखल केले व प्रथम अपीलाचा निर्णय असा देण्यात आला की, अपीलकर्त्यास निशुल्क माहिती द्यावी. त्यानुसार त्यांना माहिती प्राप्त झाली. परंतु त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

६. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २८.१२.२०१० चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक ३०.१.२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन दिनांक ८.२.२०११ रोजी अपीलकर्त्यास पत्र लिहून माहितीचे शुल्क रुपये २४८/- भरण्याबाबत

कळविले होते. तथापी अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील विस्तार अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७.३.२०११ रोजी देण्यात आला व त्या निर्णयात अपीलकर्त्यास निशुल्क माहिती देण्याचे आदेश देण्यात आले. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १.४.२०११ च्या पत्राने त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्यास पाठविली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र खर्चाबाबत ग्रामपंचायतने केलेला ठराव सविस्तर नाही असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, ज्या स्वरुपात ठरावाची प्रत उपलब्ध आहे त्या स्वरुपात ठराव अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेला आहे. माहितीचा अधिकारान्वये ज्या स्वरुपात माहिती असते त्या स्वरुपात ती माहिती दिल्याचे दिसून येते.

७. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे दिनांक १.४.२०११ च्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती विनामुल्य उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

८. **अपील क्रमांक ६२०/२०११** :- याबाबत अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत, गुमगांव, ता. हिंगणा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन ग्रामपंचायत, गुमगांव संबंधात एकूण १३ मुद्यांची माहिती मागितलेली होती. त्यांना माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती अपूर्ण असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दिनांक ५.३.२०११ रोजी विस्तार अधिकारी यांचेकडे दाखल केले. परंतु त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

९. जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २९.१२.२०१० चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक २७.१.२०११ च्या पत्राने रजिस्टर पोस्टाद्वारे माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र सदरची माहिती अपूर्ण असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल

केल्याचे नमुद केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.३.२०११ रोजी देण्यात आला व त्यामध्ये असे नमुद केले की, अपीलकर्त्याने त्यांनी ग्रामसेवक यांचे कार्यालयात उपस्थित राहून ग्रामसेवकांनी दिलेल्या माहितीचा खुलासा करुन घ्यावा व अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती १० दिवसात शुल्क भरुन घेऊन जावी असा प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला. त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांनी केलेल्या खुलाश्याप्रमाणे आवश्यक ती माहिती पोस्टाद्वारे उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती पोस्टाद्वारे अद्यापपर्यंत अपीलकर्त्यास मिळाली नसल्याचे त्यांनी सुनावणीत सांगितले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पुन्हा राहिलेल्या माहितीच्या प्रती अपीलकर्त्यास आयोगासमोर उपलब्ध करुन दिल्या. सदरची माहिती अपीलकर्त्याने स्विकृत करुन समाधान व्यक्त केले.

१०. अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांचे कडून आवश्यक ती माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ६१८/२०११ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे अपीलकर्त्याकडून माहितीचे शुल्क घेऊन राहिलेली माहिती १५ दिवसांत उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ६१९/२०११ हे खारीज करण्यात येते.

३) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ६२०/२०११ हे खारीज करण्यात येते.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-　　　दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७६६-७७०/३.८.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६२६/२०११.**

श्री. रमेश एम. रेवतकर,
जलालपुरा पोलीस चौकी मागे,
शिंदे यांचे घराजवळ, विद्या प्रकाशन गल्ली नंतर,
महाल, नागपूर - ४४० ०३२. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रबंधक,
मुंबई उच्च न्यायालय,
खंडपीठ नागपूर.

श्री. जी. एम. खापरे,
जनमाहिती अधिकारी तथा,
उपप्रबंधक,
मुंबई उच्च न्यायालय,
खंडपीठ नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.८.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ४.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २५.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन भारतीय राज्य घटनेअंतर्गत ७४ वी घटना दुरुस्ती करण्यात आली आहे. त्या घटना दुरुस्तीमुळे कोणता सामाजिक न्याय

... २

लोकांना प्राप्त होईल तसेच महानगरपालिकेला वित्तीय सहाय्य मिळाले इत्यादी संबंधाने एकूण १२ मुद्यांतील माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १८.११.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध झाली. मात्र त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील प्रबंधक यांचेकडे दिनांक ४.१२.२०१० रोजी दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील फेटाळण्यात आले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा उपप्रबंधक यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २५.१०.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने सदरच्या माहितीच्या अर्जात भारतीय राज्य घटनेत ७४ वी घटना दुरुस्ती झालेली आहे. त्या संबंधातील उद्देश, लोकांना मिळणारा सामाजिक न्याय तसेच महानगरपालिकांना मिळणारे वित्तीय सहाय्य इत्यादी संबंधात एकूण १२ मुद्यांतील माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास त्यांनी दिनांक १८.११.२०१० च्या पत्राने खालील प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

**As to points No. १ to १२** :- The information as sought by the applicant is in respect of published material i.e. ७४th Amendment (Revised) to the Constitution of India, which is available to the public at large. The published ७४th Amendment (Revised) to the Constitution of India is self explanatory. In view of Rule १३(h) of the Bombay High Court Right to Information (Revised) Rules, २००९ such information is exempted from disclosure. The Rule १३ reads as under :- "Rule-१३-Exemption from disclosure of information : The information specified under Section ८ of the Act shall not be disclosed and made available, and, in particular the following information in Rule १३(a) to (h) shall not be disclosed. The Rule-१३(h) reads as under :- (h) Information which is contained in published material available to the Public or which is available on the Web Site." Therefore, the application of the applicant stands rejected.

वरील प्रमाणे जनमाहिती यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी त्या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व जनमाहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य असल्याचे नमुद करुन प्रथम अपील फेटाळले असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे नमुद केले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने भारतीय राज्य घटनेत ७४ वी घटना दुरुस्तीबाबत माहिती मागितलेली आहे व त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १८.११.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच अपीलकर्त्याच्या प्रथम अपीलाचे निर्णयात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेल्या माहितीबाबत सविस्तर विवरण दिले असून अपीलकर्त्याचे अपील फेटाळलेले आहे. म्हणून अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १८.११.२०१० च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य व संयुक्तिक असल्याचे दिसून येते. तसेच प्रथम अपीलाचे निर्णयात याबाबत सविस्तर विवरण नमुद केले असून प्रथम अपील फेटाळलेले आहे ते योग्य असल्याचे दिसून येते. म्हणून प्रथम अपीलाचा निर्णय कायम करण्यात येत आहे. ही बाब लक्षात घेता अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७७१-७७३/४.८.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६३१/२०११.

श्री. जितेंद्र हरीश्चंद्र वाघमारे,
द्वारा - मंदा जी. बोपचे, महावीर वर्धमान वार्ड,
सहयोग कॉलनी, गणेशनगर, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. संदेश एकनाथ हाके,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
महाव्यवस्थापक (क),
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
धारावी रोड, माटुंगा, मुंबई - ४०० ०१९.

श्री. प्रविण बागुल,
जनमाहिती अधिकारी तथा,
व्यवस्थापक (क-अतां/आस्था),
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
प्लॉट नं. जी-९, प्रकाशगड, अनंत काणेकर मार्ग,
स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व) मुंबई - ४०० ०५१. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.८.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ४.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक ११.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा व्यवस्थापक (क-अतांत्रिक/आस्थापना) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांचेकडे माहितीचा

अर्ज सादर करुन उपकार्यकारी अधिकारी (वितरण) या पदाकरिता निवड केलेल्या उमेदवारांच्या संदर्भात निवड प्रक्रियेबाबत माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र त्यांना माहितीच्या अर्जातील मुद्यांप्रमाणे त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील महाव्यवस्थापक (कर्मचारी) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांचेकडे दिनांक २१.१२.२०१० रोजी दाखल केले. तथापी त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा व्यवस्थापक यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ११.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १५.११.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने उपकार्यकारी अभियेता (वितरण) या पदाकरिता निवड केलेल्या उमेदवारांचे बाबत व निवड प्रक्रियेच्या संदर्भात माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील काही मुद्ये ही प्रश्नार्थक स्वरुपाचे होते. तथापी अपीलकर्त्यास दिनांक १४.१२.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र जे मुद्ये प्रश्नार्थक स्वरुपाचे होते त्यांचेबाबत वस्तुस्थिती त्यांचे निदर्शनास आणून दिली. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील महाव्यवस्थापक यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १५.१.२०११ रोजी निर्गमित करण्यात आला व त्यामध्ये श्री. नागावकर, श्री. माने, श्रीमती खोब्रागडे यांचे संदर्भात माहिती देण्याचे आदेश दिले. तथापी सदरच्या प्रथम अपीलाचे निर्णयाने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना माहिती मिळालेली आहे. तथापी त्यांच्या अपेक्षेप्रमाणे त्यांना माहिती मिळाली नाही. तसेच श्री. माने यांची माहिती देखील त्यांना मिळाली नाही. अपीलकर्त्याचे माहिती अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्त्याने माहिती अर्जात मागितलेली काही माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याचे दिसून येते. तथापी अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा मुख्य उद्देश हा उपकार्यकारी अभियंता या पदावर निवड केलेल्या उमेदवारांना आवश्यक ती

पात्रता धारण करुन त्यांची निवड झाली आहे किंवा कसे याबाबतची माहिती त्यांना पाहिजे आहे. म्हणून प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपकार्यकारी अभियंता या पदावर निवड केलेल्या कर्मचाऱ्यांची जाहिरातीनुसार आवश्यक ती पात्रता धारण केली असल्यामुळे त्यांची निवड केली असे स्पष्टपणे कळविण्यात यावे. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास खालील प्रमाणे माहिती कळवावी.

(१) उपकार्यकारी अभियंता (वितरण) या पदाकरिता निवड केलेल्या कर्मचाऱ्यांनी आवश्यक ती शैक्षणिक पात्रता धारण केलेली असल्यामुळे त्यांची निवड करण्यात आलेली आहे.

(२) श्री. सुनील महादेव माने यांचे संबंधात अपीलकर्त्याने मागितलेली माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्त्याने महावितरणकडे दिनांक २२.२.२०१० रोजी निवड प्रक्रियेबाबत सुचना पत्र दिले आहे त्या पत्राच्या प्रमाणित प्रती अपीलकर्त्यास रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्याव्यात.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७७४-७७६/४.८.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६३२/२०११.

श्री. आनंद रामभाऊ चिमूरकर,
भानापेठ वार्ड नं. २, पोलीस लाईन जवळ,
ता. जि. चंद्रपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. पी. देशपांडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

श्री. आशिष झा,
जनमाहिती अधिकारी तथा,
मुख्याध्यापक,
विद्या निकेतन हायस्कूल,
दादावाडी, वरोरा रोड, चंद्रपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.८.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ४.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगा पुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २६.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, विद्या निकेतन हायस्कूल, चंद्रपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन सन २००५-०६ते २०१०-११ पर्यंत इयत्ता ६ वी ते १२ मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्याची संख्या व त्यांचेकडून घेण्यात येणारी फी याबाबत माहिती मागितली. तथापी त्यांना अपेक्षेप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे दिनांक २७.१२.२०१० रोजी दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

... २

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने विद्यार्थी संख्या व त्यांचे कडून जमा केलेली फी याबाबत माहिती मागितलेली होती. अपीलकर्ता यांना यापुर्वी देखील माहिती उपलब्ध करुन दिली आहे. म्हणून अपीलकर्त्याला निश्चित स्वरुपात कोणती माहिती पाहिजे आहे याचा स्पष्ट बोधे होत नाही. त्यावर अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी त्यांचया माहितीच्या अर्जामध्ये इयत्ता ६ वी ते १२ वी या वर्गाची सन २००५-०६ ते २०१०-११ पर्यंतची माहिती मागितलेली आहे. तथापी ज्या वर्षाची माहिती उपलब्ध नसेल तसे जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना कळविणे आवश्यक आहे असे त्यांनी नमुद करुन जी माहिती उपलब्ध आहे ती त्यांना देण्यात यावी असे अपीलकर्त्याने आयोगासमोर सांगितले.

४. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहिती पैंकी जी माहिती उपलब्ध असेल ती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ताचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्त्यास दिनांक २६.११.२०१० च्या माहिती अर्जातील मागितलेल्या माहिती पैकी ज्या वर्षीची माहिती उपलब्ध असेल ती माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी व ज्या वर्षीची माहिती उपलब्ध नसेल तसे अपीलकर्त्यास स्पष्टपणे कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७७७-७७८/४.८.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६३८/२०११.

श्री. भाऊराव झिंगुजी गोहत्रे,
५९, बंडू सोनी ले आऊट, परसोडी,
नागपूर - ४४० ०२२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जी. एन. देशमुख,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (प्रशासन)
आदिवासी विकास आयुक्तालय,
नाशिक.

श्रीमती एम. व्ही. देशमुख,
जनमाहिती अधिकारी तथा,
सहाय्यक प्रकल्प अधिकारी,
आदिवासी विकास आयुक्तालय,
नाशिक. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.८.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ५.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १५.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन कु. वैशाली भा. गोहत्रे, माजी आदिवासी विकास निरिक्षक यांचे संदर्भात दिनांक ७.५.२००७, दिनांक

... २

३.१२.२००९ व १५.५.२०१० रोजी दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार त्यांनी माहितीचे शुल्क भरणा केला व त्यानंतर त्यांना माहिती प्राप्त झाली. मात्र प्राप्त झालेली माहिती समाधानकारक नसल्यामुळे त्यांनी प्रथम अपील उपआयुक्त (प्रशासन) यांचेकडे दिनांक २२.२.२०११ रोजी दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १५.१.२०११ चा माहितीचा अर्ज दिनांक २९.१.२०११ रोजी त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांच्या कार्यालयात रेकॉर्डची पाहणी करण्यात आली. तथापी अपीलकर्त्याचे दिनांक ७.५.२००७ चे पत्र व दिनांक ३.१२.२००९ चे पत्र हे दोनही पत्रे त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झालेली नव्हती. तथापी त्यांच्या कार्यालयाकडे अपीलकर्त्याचा दिनांक १५.५.२०१० चा अर्ज प्राप्त झालेला होता. सदरचा अर्ज हा त्यांनी योग्य कार्यवाहीसाठी दिनांक २०.७.२०१० रोजीच्या पत्राने अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नागपूर यांचे कार्यालयाकडे पाठविण्यात आला. म्हणून प्रस्तुत प्रकरणात जी माहिती त्यांच्या कार्यालयाकउे उपलब्ध होती ती माहिती संकलीत करण्यात आली व अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क रुपये ४५/- भरण्याबाबत दिनांक २२.२.११ च्या पत्राने कळविण्यात आले. त्याला अनुसरुन अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क रुपये ४५/- दिनांक २.४.२०११ रोजी भरणा केला त्यानंतर अपीलकर्त्यास दिनांक ५.४.२०११ च्या पत्राने त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती पाठविण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र दिनांक ७.५.२००७ व दिनांक ३.१२.२००९ तसेच दिनांक १५.५.२०१० रोजी दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची अंतीम माहिती त्यांना मिळाली नाही. त्यानंतर त्यांनी प्रथम अपील दिनांक २२.२.२०११ रोजी दाखल केले होते व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २९.३.२०११ रोजी देण्यात आला व त्यामध्ये अपीलकर्त्यास असे कळविले की, आपण माहितीचे शुल्क भरणा केला नाही म्हणून आपणास माहितीची आवश्यकता नाही. त्याकरिता प्रथम अपील फेटाळण्यात आल्याचे नमुद केले.

४.      अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दिनांक ७.५.२००७ च्या अर्जाचे संबंधात त्याचप्रमाणे दिनांक ३.१२.२००९ च्या अर्जाच्या संबंधात आणि दिनांक १५.५.२०१० च्या अर्जाच्या संबंधात अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यां कार्यालयाकडून कार्यवाही करणे अपेक्षित आहे.  म्हणून सदरच्या अर्जावर त्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे मुदतीत अपीलकर्त्याच्या दिनांक ७.५.२००७, दिनांक ३.१२.२००९ व दिनांक १५.५.२०१० च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपर आयुक्त, आदिवासी विभाग, नागपूर यांचेकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तिशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-          दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७७९-७८१/५.८.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६३९/२०११.

श्री. भाऊराव झिंगुजी गोहत्रे,
५९, बंडू सोनी ले आऊट, परसोडी,
नागपूर - ४४० ०२२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बी. एस. घाटे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
वरिष्ठ संशोधन अधिकारी,
अप्पर आयुक्त,
आदिवासी विकास, गिरीपेठ, नागपूर.

श्री. व्ही. एम. जवळे,
जनमाहिती अधिकारी तथा,
सहाय्यक प्रकल्प अधिकारी,
अप्पर आयुक्त,
आदिवासी विकास, गिरीपेठ, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.८.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ५.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १८.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन कु. वैशाली भा. गोहत्रे तत्कालीन आदिवासी विकास निरिक्षक यांचे संबंधात एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना

... २

जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ५.३.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील वरिष्ठ संशोधन अधिकारी, अपर आयुक्त आदिवासी विकास, नागपूर यांचेकडे दिनांक २२.२.२०११ रोजी दाखल केले. त्यांनी दिनांक २८.३.२०११ रोजी सुनावणी घेतली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २९.३.२०११ रोजी निर्गमित केला. मात्र त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १८.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्यांचे कार्यालयातील आस्थापना शाखेशी संबंधित असल्याने त्यांनी आस्थापना शाखेकडे दिनांक २१.१.२०११ च्या पत्राने माहिती देण्यास कळविले. आस्थापना विभागातून माहिती संकलीत केली व सदरची माहिती संकलीत करण्यास कालावधी लागला. तथापी आस्थापा शाखेकडून माहिती तयार झाल्यानंतर अपीलकर्त्यास दिनांक ५.३.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. मात्र त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील वरिष्ठ संशोधन अधिकारी यांचेकडे दाखल केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २८.३.२०११ रोजी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २९.३.२०११ रोजी देण्यात आला. प्रथम अपीलाचे निर्णयात अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संबंधात केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्याचे आदेश देण्यात आले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. प्रथम अपीलाचे निर्णयाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा अपीलकर्त्यास दिनांक २.४.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. अपीलकर्त्यास दिनांक ५.३.२०११ च्या पत्राने व दिनांक २.४.२०११ च्या पत्राने पाठविलेली माहिती प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले व प्राप्त झालेल्या माहिती बाबत समाधान व्यक्त केले. म्हणून प्रस्तुत प्रकरणी त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन आवश्यक ती माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६३६/२०११.**

श्रीमती वंदना जर्नादन डोंगरे,
रा. डॉक्टर कॉलनी, अजनी रेल्व स्टेशन समोर,
क्वा. नं. ए-२/२, नागपूर. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
मेडिकल, नागपूर.

श्री. पी. डी. दोरवे,
जनमाहिती अधिकारी तथा,
मुख्य प्रशासकीय अधिकारी,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
मेडिकल, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.८.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक १५.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ५.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ती व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक २५.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन शासकीय निवासस्थान घरभाडे बाबतची माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्ती यांना माहिती मिळाली असल्याने अपील मागे घेत असल्याबाबत रोजनामावर स्वाक्षरी केली आहेत. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७८५/५.८.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६५०/२०११ व अपील क्रमांक ६५१/२०११.**

श्री. जयवंत मधुकर मिश्रा,
प्लॉट नं. १६, जवाहर कॉलनी,
मु. पो. पुलगांव, ता. देवळी,
जि. वर्धा - ४४२ ३०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक धर्मदाय आयुक्त,
एल.आय.सी.चे बाजूला, जुना आर्वी स्टॅन्ड,
नागपूर रोड, वर्धा.

जनमाहिती अधिकारी तथा,
अध्यक्ष/सचिव,
ललिता शिक्षण संस्था ट्रस्ट,
द्वारा - ललिताबाई मुरारका हायस्कूल,
पुलगांव, ता. देवळी, जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.८.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ८.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. या दोन्ही अपीलामध्ये अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी हे एकच असल्यामुळे दोन्ही अपीलाची एकत्रित सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्रीमती एम. एस. पाली, लेखाधिकारी तथा सहाय्यक माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. **अपील क्रमांक ६५०/२०११** :- याबाबत अपीलकर्ता यांनी आयोगाकडे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ९.६.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव, ललिता शिक्षण संस्था ट्रस्ट, पुलगांव, ता.

... २

देवळी, जि. वर्धा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन त्यांच्या हायस्कूलमध्ये शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. विनोद गंगाराम बियाला यांनी दिनांक २८.८.२००६ रोजी माहितीचा अर्ज केला होता. त्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील सहाय्यक धर्मदाय आयुक्त, वर्धा यांचेकडे दिनांक १९.७.२०१० रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपील फेटाळण्यात आले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले. तसेच अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, ललिता शिक्षण संस्था ट्रस्ट, पुलगांव या ट्रस्ट मार्फत हायस्कूल कार्यरत आहे व सदरच्या हायस्कूलला शासनाकडून अनुदान प्राप्त होत असते. म्हणून सदरच्या संस्थेच्या संबंधात त्यांना माहितीच्या अधिकाराखाली माहिती मिळणे आवश्यक आहे असे त्यांनी आयोगापुढे नमुद केले.

३. **<u>अपील क्रमांक ६५१/२०११</u>** :- याबाबत अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १०.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव, ललिता शिक्षण संस्था ट्रस्ट, पुलगांव यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन ललिता एज्युकेशन ट्रस्ट, पुलगांव या ट्रस्टच्या संदर्भात एकूण २४ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील सहाय्यक धर्मदाय आयुक्त, वर्धा यांचेकडे दिनांक ३०.६.२०१० रोजी दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील फेटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

४. जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव, ललिता शिक्षण संस्था ट्रस्ट, पुलगांव हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधीने आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याने ललिता शिक्षण संस्था ट्रस्ट, पुलगांव या विषयी माहिती मागितलेली आहे. तथापी सदरच्या ट्रस्टच्या संदर्भात सहाय्यक धर्मदाय आयुक्त हे प्रथम अपीलीय अधिकारी नाही म्हणून अपीलकर्त्याचे प्रथम अपील फेटाळलेले आहे.

५. अपीलकर्ता यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी ललिता शिक्षण संस्था ट्रस्ट, पुलगांव, ता. देवळी, जि. वर्धा या संस्थेच्या संबंधात माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागितलेली आहे. सदरच्या ट्रस्ट मार्फत हायस्कूल कार्यरत असून सदरच्या हायस्कूलला शासनाकडून

... ३

अनुदान मिळत असते. म्हणून ज्या ट्रस्टच्या शैक्षणिक संस्थांना शासनाकडून अनुदान प्राप्त होत असते अशा ट्रस्टला माहितीच्या अधिकाराच्या तरतुदी लागू होतात. म्हणून अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ६५०/२०११ व अपील क्रमांक ६५१/२०११ हे दोन्ही अपीले मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव, ललिता शिक्षण संस्था ट्रस्ट, पुलगांव, ता. देवळी, जि. वर्धा यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या दिनांक ९.६.२०१० व दिनांक १०.५.२०१० च्या माहिती अर्जातील संपूर्ण माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव, ललिता शिक्षण संस्था ट्रस्ट, पुलगांव यांनी अपीलकर्त्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार अपील क्रमांक ६५०/२०११ व अपील क्रमांक ६५१/२०११ या अपीलामध्ये नमुद केलेल्या माहितीच्या अर्जांना अनुसरुन ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये अपील क्रमांक ६५०/२०११ मध्ये रुपये १००००/- व अपील क्रमांक ६५१/२०११ मध्ये रुपये १००००/- असे एकूण रुपये २००००/- शास्ती कां लादण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगापुढे हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत सादर करावा.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/७८६ - ७८८/८.८.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६५६/२०११.

श्री. ईश्वर गणपतराव सतई,
६४, एम.आय.जी. २/८, हिवरी नगर,
भंडारा रोड, नागपूर - ४४० ००८. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख,
नागपूर.

श्री. एस. के. पाटील,
जनमाहिती अधिकारी तथा,
उपअधिक्षक, भूमी अभिलेख,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.८.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ८.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. पी. टी. भूते, प्रमुख लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपअधिक्षक, भूमी अभिलेख, उमरेड यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन ३ मुद्यांची माहिती मागितलेली होती. सदरच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्याने दिनांक ८.८.२०११ रोजी लेखी निवेदन सादर करुन मला माहिती प्राप्त झालेली असून माझे समाधान झालेले आहे. सदर अपील निकाली काढण्यास माझा कसल्याही प्रकारचा आक्षेप नाही असे लेखी लिहून दिले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ७८९/८.८.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६५७/२०११.

श्री. शंकर किसन बावणे,
रा. गोंदोडा, पो. केवाडा, ता. चिमूर, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. भूषण मून,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, चंद्रपूर.

श्री. सोरदे,
जनमाहिती अधिकारी तथा,
कनिष्ठ अभियंता, उपविभागीय अधिकारी
जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, चिमूर, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.८.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ८.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.२.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, चिमूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन रोजगार हमी योजनांतर्गत मजुरांची ३ मुद्यांची माहिती मागितलेली होती. सदरच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्याने दिनांक ८.८.२०११ रोजी राज्य माहिती आयुक्त यांना लेखी निवेदन सादर करुन सदर माहिती मला दिनांक २.८.२०११ ला प्राप्त झालेली आहे. त्यामुळे मी आपल्याकडे केलेली अपील परत घेत आहे असे लेखी लिहून दिले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ७९०/८.८.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६५८/२०११.

श्री. चैतन्यश्वर उदाराम डेकाटे,
साल्पेकर वाडयाच्या बाजुला, संघ बिल्डींग मागे,
महाल, नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सोमेश्वर नैताम,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्रीमती योगिता ढवळे,
जनमाहिती अधिकारी तथा,
मुख्याध्यापिका,
कोलबास्वामी उच्च प्राथमिक शाळा,
प्रेमनगर, झेंडाचौक, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.८.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ९.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २३.७.२०१० चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २४.७.२०१० रोजी प्राप्त झाला होता व त्या अर्जाला अनुसरुन

... २

अपीलकर्त्यास दिनांक २१.८.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास उत्तर पाठविले होते. सदरचे पत्र अपीलकर्त्याने स्विकारले नाही म्हणून पोस्टाचा त्या पाकीट वरती Not claimed असा शेरा मारुन ते पत्र परत आल्याबाबतचा पुरावा म्हणून ते आयोगासमोर दाखविले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे दिनांक २९.९.२०१० रोजी दाखल केले. त्या अपीलाची सुनावणी घेण्यात आली व सुनावणी घेऊन प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला व त्या निर्णयामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास अपूर्ण माहिती दिलेली आहे. म्हणून १ आठवडयाचे आंत अपीलकर्त्यास संपूर्ण माहिती देण्यात यावी असा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी दिला व त्या निर्णयाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी दिनांक २४.१२.२०१० च्या पत्राने शिक्षणाधिकारी मार्फत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पाठविले व शिक्षणाधिकारी यांचे कडून अपीलकर्त्यास दिनांक ११.१.२०११ रोजी माहिती देण्यात आली व त्याबाबतची पोच शिक्षणाधिकारी यांनी आयोगापुढे दाखविले.

४. जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर वर नमुद केल्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी शिक्षणाधिकारी मार्फत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ७९१ - ७९२ /९.८.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६५९/२०११.

श्री. बि. व्ही. बेताल,
काजी वार्ड, बस स्टँड समोर,
ता. हिंगणघाट, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती हेमलता गजभिये,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

श्री. अरविंद गोटेकर,
जनमाहिती अधिकारी तथा,
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.८.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ९.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक ६.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन द्वितीय अपीलाबाबत एकूण ६ मुद्यांवर प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना जनमाहिती

... २

अधिकारी यांनी दिनांक १३.१.२०११ च्या पत्राने पत्र पाठवून अशी माहिती कळविली की, आपल्याला सर्वसाधारणपणे माहिती अधिकाराच्या तरतुदींबाबत मार्गदर्शन/अभिप्राय हवे आहे. यासंदर्भात आपले लक्ष केद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कडे वेधण्यात येत आहे. आपल्याला आवश्यक असेलेली माहिती सदर अधिनियमाच्या अभ्यासातुन प्राप्त होऊ शकेल. तथापी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदी संदर्भात जनमाहिती अधिकारी यांचेकडून मार्गदर्शन करणे/अभिप्राय देणे अपेक्षित नाही. तसेच आपल्याला माहिती अधिकारासंबंधात आवश्यक असणारे परित्रक/शासन निर्णय, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत अशी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपसचिव यांचेकडे दिनांक ७.२.२०११ रोजी दाखल केले. उपसचिव यांनी जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य ठरवून अपीलकर्त्याचे प्रथम अपील फेटाळण्यात आल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ६.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता व अपीलकर्त्यास दिनांक १३.१.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी सांगितले. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १३.१.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे त्यांचे प्रथम अपील फेटाळण्यात आलेले आहे.

४. अपीलार्थी, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात माहिती अधिकारासंबंधात व तरतुदीसंबंधात मार्गदर्शन व प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी माहितीच्या अधिकारात प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती किंवा मार्गदर्शन, अभिप्राय इत्यादी माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १३.१.२०११ च्या पत्राने त्यासंबंधात उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य व संयुक्तिक आहे. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ३

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६६१/२०११.**

श्री. नंदलाल ऊर्फ जगन्नाथ परशराम अलघरे,
प्लॉट नं. ४३, गायत्रीनगर, झिंगाबाई टाकळी,
नागपूर - ४४० ०३०. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सावरकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी,
नागपूर.

श्री. ए. पी. गावंडे,
जनमाहिती अधिकारी तथा,
उपविभागीय अधिकारी,
ता. सावनेर, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.८.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ९.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ३.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सावनेर यांच्याकडे माहितीचा अर्ज सादर करुन एकूण ४ मुद्यांवर माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील अतिरिक्त जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे दिनांक २८.१२.२०१० रोजी दाखल केले व प्रथम अपीलाचे निर्णयात

... २

अपीलकर्त्यास एकूण ४ मुद्यांची उत्तरे दिनांक १४.१.२०११ पर्यंत देण्यात यावे असा निर्णय दिला. तथापी त्या निर्णयाने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सावनेर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ३.८.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक ४.८.२०१० रोजी प्रापत झाला होता. अपीलकर्त्याला त्यांच्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्याने माहिती व्यक्तिशः मागितलेली असल्यामुळे अपीलकर्त्यास त्यांनी दिनांक ९.८.२०१० रोजी पंजीबध्द डाकेने अर्जदार यांना माहिती घेऊन जाण्याबाबत कळविले होते. त्यानुसार अर्जदार दिनांक १६.८.२०१० रोजी त्यांचे कार्यालयात हजर झाले व जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्यास दिली. तथापी अपीलकर्त्याने सदरची माहिती घेण्यास नकार दिला व आदेशावर अपीलकर्त्याने सही केली नाही. म्हणून अपीलकर्त्यास दिनांक १७.८.२०१० च्या पत्राने त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती पाठविण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास दिनांक २०.८.२०१० रोजी प्राप्त झाल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. मात्र यावर अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांना सदरची माहिती प्राप्त झाली मात्र त्यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती सोडून इतर माहिती त्यांना देण्यात आली असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे.

४. तसेच प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दाखल झाले होते. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व सुनावणीमध्ये अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील मुद्याप्रमाणे ४ ही मुद्यांची उत्तरे जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १४.१.२०११ रोजी प्रत्यक्ष बोलावून द्यावी असा आदेश प्रथम अपीलात देण्यात आल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले व प्रथम अपीलाचे निर्णयाचे अनुषंगाने पुन्हा अपीलकर्त्यास दिनांक १४.१.२०११ च्या पत्राने ४ ही मुद्यांची मुद्येनिहाय उत्तरे देऊन त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती पाठविलेली दिसून येते. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यांचे अपेक्षेप्रमाणे त्यांना माहिती मिळाली नाही असे त्यांनी नमुद केले.

५.        जनमाहिती  अधिकारी यांनी अपीलकर्त्यास प्रथम अपीलाचे निर्णयानंतर दिनांक १४.१.२०११ च्या पत्राने ४ ही मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.  त्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे माहितीच्या स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली आहे व जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत वस्तुस्थिती कळविली आहे.  म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-          दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ७९६ - ७९८ /९.८.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६६०/२०११.

श्री. मारोती विठोबाजी भुजकर,
जटपुरा वार्ड नं. ६६, पंचशील चौक,
रविदास वाचनालयाचे मागे, चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन महामंडळ,
दुर्गापूर रोड, तुकूम, जि. चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा,
विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,
राज्य परिवहन महामंडळ,
दुर्गापूर रोड, तुकूम, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.८.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ९.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन महामंडळ, चंद्रपूर यांचेकडे २ मुद्यांची माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यास दिनांक ४.८.२०११ रोजी माहिती मिळाल्याबाबत अपीलकर्त्याने विभाग नियत्रक, राज्य परिवहन, चंद्रपूर यांचेकडे लेखी निवेदन सादर केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ७९९ /९.८.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६६६/२०११.

श्री. अरुण पंजाबराव मालवार,
बाराखोली, नारा रोड, जरीपटका,
नागपुर - ४४० ०१४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. राजेश शी. कराडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त,
आशीनगर झोन क्रमांक ९,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. ए. जी. नागदिवे,
जनमाहिती अधिकारी तथा,
उपविभागीय अभियंता (लोककर्म),
आशीनगर झोन क्रमांक ९,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.८.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १०.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १३.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता (लोककर्म), आशीनगर झोन क्रमांक ९, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन मौजा इंदोरा, खसरा क्रमांक ६४, सीटी सर्व्हे क्रमांक ४७२ याबाबत माहिती मागितलेली होती. त्यांना महानगरपालिकाकडून दिनांक १८.१२.२००९ च्या पत्राने असे कळविण्यात आले की, आपण सादर केलेल्या नकाशातील भुखंड विकास आराखडयानुसार State Transport stand करिता

... २

आरक्षित आहे. मात्र त्यांना पुन्हा महानगरपालिकेने दिनांक १५.११.२०१० रोजी असे कळविले की, आपण सादर केलेला मौजा इंदोरा, खसरा क्रमांक ६४ नकाशावर मंजुर विकास आराखडयानुसार असलेला वापर हा निवासी क्षेत्र म्हणून दाखविले आहे. म्हणून सद्य:स्थितीत खसरा क्रमांक ६४ ची वस्तुस्थिती काय आहे याची माहिती त्यांना मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांनी आयोगापुढे सांगितले की, पुर्वी सदरचा खसरा संबंधाने नागपुर सुधार प्रन्यास, नागपूर हे नियोजन प्राधिकरण होते. मात्र आता दिनांक २७.२.२००२ पासून महानगरपालिका, नागपूर हे नियोजन प्राधिकरण म्हणून आहे. म्हणून प्रस्तुत खसऱ्याच्या संदर्भात सदर क्षेत्र हे निवासी क्षेत्र आहे, अगर सदरच्या निवासी क्षेत्रात State Transport stand करिता आरक्षण आहे, अगर कसे याची नागपूर सुधार प्रन्यासची कागदपत्रे व महानगरपालिकाची कागदपत्रे तपासणी करुन व त्याबाबत खात्री करुन अपीलकर्त्यास खसरा क्रमांक ६४ बाबतची वस्तुस्थिती विनामुल्य कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे खसरा क्रमांक ६४ बाबत नागपूर सुधार प्रन्यासची कागदपत्रे व नागपूर महानगरपालिकेची कागदपत्रे यांची पाहणी व तपासणी करुन व खात्री करुन खसरा क्रमांक ६४ च्या संदर्भात वस्तुस्थिती कळवावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८००- ८०१ /१०.८.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६६९/२०११.**

कु. संगीता वासुदेवराव गुल्हाने,
(सौ. संगीता प्रभाकरराव घाटे),
एस. टी. डेपो जवळ, वार्ड नं. ३०,
रामनगर, वर्धा - ४४२ ००१. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. सुधाकर कुळमेथे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त,
भुसूधार शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय,
नागपूर.

श्रीमती प्रिया कावळे,
जनमाहिती अधिकारी तथा,
नायब तहसीलदार,
विभागीय आयुक्त कार्यालय,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.८.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक १८.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १०.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ती यांचे वतीने त्यांचे पती श्री प्रभाकर घाटे हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १३.४.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा विभागीय आयुक्त, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळ, नागपूर

यांनी शिल्प निदेशक (शिवण व कर्तन) हे पद जाहिरातीद्वारे भरलेले होते. सदरची पद सन १९९६ या वर्षात भरलेले आहे. त्या पदाच्या भरतीच्या संबंधात त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २०.५.२००९ च्या पत्राने असे कळविण्यात आले की, आपण मागितलेल्या माहितीचा शोध घेतला असता सदर अभिलेख मंडळाचे अभिलेखामध्ये आढळून आलेला नाही. म्हणून सदरची माहिती उपलब्ध नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले. त्यानंतर त्यांनी प्रथम अपील सहाय्यक आयुक्त भुसूधार शाखा यांचेकडे दिनांक २९.६.२००९ रोजी दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्तीचा दिनांक १३.४.२००९ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दिनांक २४.४.२००९ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्तीने सन १९९६ मध्ये प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळामार्फत शिल्प निदेर्शक या पदाच्या भरती बाबतची माहिती मागितलेली होती. सन १९९६ मध्ये प्रादेशिक निवड मंडळ, नागपूर हे अस्तित्वात असतांना त्यांचे मार्फत या पदाची भरती करण्यात आली होती. त्यानंतर प्रादेशिक निवड मंडळ, नागपूर हे मंडळ दिनांक ११ जून १९९९ च्या शासन निर्णयाने बरखास्त करण्यात आले आहे. त्यामुळे सदर प्रादेशिक निवड मंडळ आता अस्तित्वात नाही. त्याचप्रमाणे प्रादेशिक निवड मंडळाच्या दिनांक १६.१.१९९३ च्या आदेशानुसार उमेदवारांच्या भरती संबंधातील अभिलेखाचे जतन कालावधी शिफारस केलेल्या तारखेपासून दिड ते दोन वर्षाचा असल्यामुळे सदरचा अभिलेख नष्ट करण्यात आल्याची शक्यता आहे. त्यामुळे अपीलकर्तीने मागितलेल्या माहितीचा शोध घेऊनही सदरची माहिती उपलब्ध होऊ शकली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. त्यानंतर अपीलकर्तीने प्रथम अपील सहाय्यकआयुक्त, भुसूधार शाखा यांचेकडे दाखल केले. सहाय्यक आयुक्त, भूसुधार शाखा यांनी दिनांक २१.८.२००९ च्या पत्राने अपीलकर्तीस असे कळविले की, आपण मागितलेल्या माहितीच्या अभिलेखाचा शोध घेण्यात आला. मात्र आपण मागितलेली माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. तथापी सध्या उपलब्ध असलेल्या कागदपत्रांपैकी आपणास आवश्यक असलेली कागदपत्रे पुरविता येतील. आपण उपलब्ध झालेल्या कागदपत्रांची तपासणी या कार्यालयात येऊन करावी म्हणजे आपणास आवश्यक कागदपत्रे पुरविता येतील असे अपीलकर्तीस प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कळविले. मात्र अद्याप अपीलकर्ती त्यांचे कार्यालयात उपस्थित झाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ती, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यांनंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्तीने मागितलेली माहिती ही सुमारे १५ वर्षापुर्वीची माहिती आहे. तसेच आता प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळ, नागपूर हे सन १९९९ च्या सुमारास बरखास्त झालेले आहे. तथापी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळाकडील उपलब्ध असलेली कागदपत्रे अपीलकर्तीस निरिक्षण करण्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्तीचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हें अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस अभिलेखाचे निरिक्षण करण्यासाठी तारीख व वेळ लेखी कळवावी. त्यानंतर अपीलकर्तीने जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून संबंधित रेकॉडचे निरिक्षण करुन घ्यावे व निरिक्षणानंतर माहिती उपलब्ध असल्यास माहितीचे शुल्क भरुन घेऊन प्राप्त करुन घ्यावी.

३) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८०२- ८०४ /१०.८.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६६८/२०११.**

श्री. राधेश्याम रामकिसन हेडाऊ,
माहुळकर पेंटर जवळ,
लालगंज पोलीस चौकीजवळ,
नागपुर - ४४० ०१७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक, भुमी अभिलेख,
नागपूर.

श्री. यु. एम. घरडे,
जनमाहिती अधिकारी तथा,
उपअधिक्षक, भूमी अभिलेख,
ता. कामठी, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.८.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १०.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. पी. टी. भुते, प्रमुख लिपिक हे हजर आहेत.

२. प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १५.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १९.१.२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने माहितीच्या

... २

अर्जात शेत जमीनीची मोजणी व दुरुस्तीबाबत तसेच मोजणीसाठी लागणाऱ्या व्यक्तीबाबत, मोजणीच्या प्रक्रिये संबंधात माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १०.२.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती पोस्टाद्वारे पाठविली. सदरची माहिती पोस्टाद्वारे पाठविल्याबाबतचा पुरावा जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दाखविला.

४. मात्र त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, नागपूर यांचेकडे दिनांक २३.३.२०११ रोजी दाखल केले व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्याची सुनावणी ठेवली. त्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर राहिले. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ९.५.२०११ रोजी दिला व त्यामध्ये असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले आहे. तथापी वादी यांनी प्रथम जनमाहिती अधिकारी तथा उपअधिक्षक, भूमी अभिलेख, कामठी यांचेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी. तथापी अपीलकर्ता पुन्हा जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहिती घेण्यास हजर झाले नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या दिनांक १५.१.२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन दिनांक १०.२.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरची माहिती पोस्टोन अपीलकर्त्यास पाठविलेली आहे. अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हें खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६८०/२०११.

श्रीमती शिला रघुनाथ गुप्ता,
जवाहर कॉलनी, पुलगांव,
ता. देवळी, जि. वर्धा - ४४२ ३०२. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्रीमती गीता रमेश वंजारी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, कारजां (लाड),
जि. वाशिम.

श्री. चारुदत्त दंडवते,
जनमाहिती अधिकारी तथा,
कनिष्ठ अभियंता, (बांधकाम विभाग),
नगर परिषद, कारंजा (लाड),
जि. वाशिम. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.८.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक २४.२.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, अमरावती यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ती यांचे वतीने त्यांचे पती हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांचे पतीने आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, बांधकाम विभाग, नगर परिषद, कारंजा (लाड) यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन नगर परिषद कारंजाने ज्या १४ व्यक्तींना औद्योगिक क्षेत्रामध्ये व्यापार उपयोगासाठी बांधकाम परवानगी दिली आहे त्याबाबत माहिती मागितलेली होती. तसेच श्री. मालपानी शॉपींग सेंटरला परवानगी दिल्याबाबत

... २

माहिती मागितलेली होती. या माहितीमध्ये मुख्यतः ज्या मुख्याधिकारी यांनी बांधकाम परवानगी दिली आहे त्यांची नावे त्यांनी मागितलेली होती. त्यांना दिनांक १.१.२०११ रोजीच्या पत्राने मुख्याधिकारी यांच्या नावाची यादी प्राप्त झाली. मात्र सदरच्या माहितीची झेरॉक्स अस्पष्ट असल्यामुळे ती वाचता येत नव्हती. म्हणून त्यांनी प्रथम अपील मुख्याधिकारी, नगर परिषद, कारजां (लाड) यांचेकडे दिनांक ५.१.२०११ रोजी दाखल केले. मुख्याधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिला व त्या निर्णयामध्ये असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीने मागितलेल्या माहितीचे कालावधीतील जे मुख्याधिकारी कार्यरत होते त्यांच्या नावांचा उल्लेख असलेल्या कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्राच्या प्रती लेखाअधिकारी यांनी संकलीत करुन अपीलकर्ती यांना १० दिवसांत विनामुल्य द्याव्यात. तथापी त्यांना अद्यापही माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्तीचा दिनांक १.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक ३.११.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्तीस दिनांक १.१२.२०१० रोजी माहितीचे शुल्क भरण्याचे पत्र दिले व त्यानंतर अपीलकर्तीस दिनांक १.१.२०११ रोजी मुख्याधिकाऱ्यांच्या नामावलीच्या बोर्डावरील फोटोची कॉपी काढून त्यांची झेरॉक्स प्रत अपीलकर्तीस पाठविली. मात्र सदरची झेरॉक्स प्रत ही अस्पष्ट असल्याचे दिसून आले. म्हणून अपीलकर्तीने प्रथम अपील मुख्याधिकारी यांचेकडे दाखल केले. मुख्याधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २.२.२०११ रोजी दिला व त्यामध्ये असे नमुद केले की, अपीलकर्तीने मागितलेल्या कालावधीत जे मुख्याधिकारी कार्यरत होते त्यांच्या कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्राची प्रत अपीलकर्तीस १० दिवसात विनामुल्य उपलब्ध करुन द्यावीत असे प्रथम अपीलाचे निर्णयात नमुद केल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ४.२.२०११ रोजी माहिती अधिकारी लेखा विभाग, नगर परिषद, कारजा (लाड) यांना पत्र देऊन प्रथम अपीलाचे निर्णयानुसार मुख्याधिकाऱ्यांचे कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्राच्या प्रती अपीलकर्तीस त्वरित देण्यात याव्या असे कळविले. तथापी जनमाहिती अधिकारी लेखा विभाग यांचेकडून माहिती प्राप्त झाली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

५. लेखा विभागाचे जनमाहिती अधिकारी हे देखील उपस्थित होते. अपीलकर्तीच्या प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे १० दिवसाचे मुदतीत कां माहिती उपलब्ध करुन दिली नाही याबद्यल त्यांना खुलासा विचारला असता त्यांनी असे नमुद केले की, त्यांचे कार्यालयाचे स्थलांतर झाले होते. म्हणून अपीलकर्तीस अद्यापपर्यंत माहिती देता आली नाही. तथापी जनमाहिती अधिकारी लेखा विभाग यांचा हा खुलासा मान्य करण्यासारखा नाही. तसेच अपीलकर्तीच्या प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे आवश्यक ती माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस १० दिवसांत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्तीचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हें अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांत आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे लेखा विभागाकडून आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेऊन अपीलकर्तीस विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) जनमाहिती अधिकारी लेखा विभाग, नगर परिषद, कारंजा (लाड) यांचे कडून प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे १० दिवसांचे मुदतीत अपीलकर्तीस कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली दिसून येत नाही म्हणून माहितीच्या विलंबाबद्यल लेखा विभागाचे जनमाहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. या विलंबाबद्यल त्यांनी केलेला खुलासा हा मान्य करण्यासारखा नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी लेखा विभाग यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

३) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही मुख्याधिकारी, नगर परिषद, कारंजा(लाड), जि. वाशिम यांनी करावयाची आहे.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८०८- ८१० /११.८.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६७९/२०११.

श्री. घनश्याम सुखराम चिखलोंडे,
रा. चुलोद, पो. दतोरा, ता. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. रा. गो. राऊत,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (निम्म श्रेणी)
मुद्रांक जिल्हाधिकारी,
पेटकर बिल्डींग, संत तुकडोजी वार्ड,
एस. पी. कार्यालयाचे मार्ग, भंडारा.

श्री. आर. के. गायधने,
जनमाहिती अधिकारी तथा,
सह दुय्यम निबंधक वर्ग- २,
तहसील कार्यालय परिसर, गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.८.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या कार्यालयाकडे दिनांक ७.१.२०११ रोजी अपीलकर्त्याने माहितीचा अर्ज सादर केला होता व त्या अर्जामध्ये सन १९७० आणि १९७९ या कालावधीत मौजा नागरा येथील नोंदणी झालेले दस्ताऐवज क्रमांक २०८१, दिनांक १९.५.१९७० आणि दस्तऐवज क्रमांक २२४१, दिनांक ४.४.१९७९ या नोंदणी झालेल्या दस्ताऐवजांचे प्रती त्यांनी मागितलेल्या होत्या. अपीलकर्त्याने

दारिद्रय रेषेखालील असल्याचे प्रमाणपत्र जोडले होते. तथापी भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ व महाराष्ट्र नोंदणी नियम, १९६१ चे कलम ५७(१) नुसार दस्ताऐवजांचे प्रमाणित प्रत मागणीकरिता फी विहित केली आहे. त्यानुसार अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क भरण्याबाबत दिनांक ९.२.२०११ रोजी पत्र दिले. अपीलकर्त्याने दिनांक ३१.३.२०११ रोजी शुल्क रुपये ४०/- भरणा केला व अपीलकर्त्यास दिनांक ३१.३.२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, ते दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांना विनामुल्य माहिती मिळणे आवश्यक होते. मात्र जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २००५ कलम ४(१) प्रमाणे विभागांची कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याकरिता त्या विभागाकडून पुर्वी नियम केले असल्यास त्याप्रमाणे फीचा भरणा करावा व त्यामुळे अपीलकर्त्याकडून फीचा भरणा करुन कागदपत्रे उपलब्ध करुन घेतलेली आहेत. हे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे योग्य दिसून येते. म्हणून अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८११- ८१२ /११.८.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६८१/२०११.**

श्री. अविनाश श्यामराव रामटेके,
आंबेडकर वार्ड, वरठी, ता. मोहाडी,
जि. भंडारा - ४४१ ९०५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. ब. वा. चिखले,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक कामगार आयुक्त,
वृंदावन, तकीया वार्ड, भंडारा.

श्री. प्र. ल. बाभूळकर,
जनमाहिती अधिकारी तथा,
सरकारी कामगार अधिकारी,
सहाय्यक कामगार आयुक्त,
वृंदावन, तकीया वार्ड, भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.८.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १३.९.२०१० रोजी जनमाहिती तथा सरकारी कामगार अधिकारी, सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, भंडारा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन सनफ्लॅग आर्यन ॲन्ड रियल कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, वरठी, ता. मोहाडी, जि. भंडारा येथील कंपनीतील

... २

कर्मचाऱ्यांचे भरती बाबत त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचे कडून दिनांक ६.१०.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध झाली व त्यामध्ये असे कळविले की, मे. सनफ्लॅग आर्यन ॲन्ड रियल कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, वरठी या आस्थापनेत अंदाजे ७५० कंत्राटी कामगार कार्यरत आहेत. कंत्राटी कामगार अधिनियम, १९७० मध्ये कामगारांच्या सेवाशर्तीमध्ये कामगारांना स्थायी करण्याबाबत कोणतेही नियम तयार केलेले नाहीत. तथापी कंत्राटी कामगाराचा कामावर असतांना मृत्यु झाल्यास श्रमिक भरपाई अधिनियम, १९२३ अंतर्गत कामगार न्यायालयात नुकसान भरपाई करिता अर्ज दाखल करता येतो. अशी माहिती त्यांना उपलब्ध झाली. मात्र कामगारांची यादी त्यांना प्राप्त झाली नाही. तसेच या कंपनीतील कामगार भरतीत स्थानिक ८० टक्के व्यक्ति भरलेले नाहीत यासाठी त्यांना कामगारांच्या यादीची आवश्यकता आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १३.९.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २०.९.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने सनफ्लॅग आर्यन ॲन्ड रियल कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, वरठी, बाबत माहिती मागितली. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली सर्व माहिती त्यांचे कार्यालयामध्ये ठेवण्यात येत नाही. तथापी त्यांचे कार्यालयाकडे जी माहिती होती ती माहिती अपीलकर्त्यास दिनांक ६.१०.२०१० च्या पत्राने पाठविली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र कामगारांची यादी त्यांना मिळालेली नाही.

४. याबाबत जनमाहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त यांनी आयोगापुढे असे सांगितले की, महाराष्ट्र किमान वेतन अधिनियम, १९४८ नुसार व कंत्राटी कामगार अधिनियम, १९७० नुसार कामगारांची हजेरी व वेतन रजिस्टर तपासण्याचे अधिकार सरकारी कामगार अधिकारी यांना आहेत, असे त्यांनी आयोगापुढे सांगितले म्हणून या तरतुदी अन्वये जनमाहिती अधिकारी यांनी प्रस्तुत कंपनीच्या वेतन रजिस्टर व हजेरी रजिस्टर यांची तपासणी करुन त्याची प्रत कंपनीकडून उपलब्ध करुन घेऊन अपीलकर्त्यास त्या प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. हजेरी रजिस्टर व वेतन रजिस्टरच्या प्रती उपलब्ध करुन दिल्यास त्यावरुन कामगारांची नावे अपीलकर्त्यास उपलब्ध होतील असे सरकारी कामगार अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ३

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हें अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास प्रस्तुत कंपनीच्या कामगारांच्या हजेरी रजिस्टर व वेतन रजिस्टरची प्रत कंपनीकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६९७/२०११.

श्री. अरुण अमृत गवई,
सी. पी. डब्ल्यु. डी. क्वार्टर नं. २७,
टाईप - ३ (जुना), सिव्हिल लाईन,
नागपूर - ४४० ००१. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, अकोला.

जनमाहिती अधिकारी तथा,
शिरस्तेदार,
उपविभागीय अधिकारी, अकोला. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.८.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, अकोला यांचेकडे एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती मिळाल्याबाबतचे निवेदन त्यांनी आयोगाकडे दिनांक ४.८.२०१० रोजी सादर करुन अपील खारीज करण्याबाबत कळविले. म्हणून सदचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८१६ /१७.८.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७१६/२०११.**

श्री. डॉ. एच. एस. कनोजे,
३७ बी, गांधी ले आऊट, जाफर नगर,
नागपूर - ४४० ०१३. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. एस. एम. कडक,
जनमाहिती अधिकारी तथा,
मुख्याध्यापक,
क्रिसेंट इंग्लिश हायस्कूल,
संतोषी बिल्डींग, सेंट्रल एव्हेन्यु, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.८.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २२.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्रीमती पतंगे, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २८.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, क्रिसेंट इंग्लिश हायस्कूल, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन मुस्ताक मनसुरी, सहाय्यक शिक्षक, क्रिसेंट इंग्लिश हायस्कूल यांचे नेमणूकीबाबत माहिती मागितलेली होती. त्यांना माहिती प्राप्त झ ाली. मात्र अपूर्ण माहिती त्यांना मिळाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

... २

३.	जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, क्रिसेंट इंग्लिश हायस्कूल, नागपूर ही शाळा विना अनुदान तत्वावर कार्यरत आहे. शासनाकडून सदरच्या शाळेला कोणत्याही प्रकारचे अनुदान प्राप्त होत नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी या शाळेला लागू होत नाही. तथापी अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २५.५.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्ता यांनी आयोगापुढे मान्य केले.

४.	अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्या नंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, सदरच्या शाळेला शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान प्राप्त होत नाही. म्हणून सदरची शाळा ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी नुसार सार्वजनिक प्राधिकरण यामध्ये मोडत नाही. म्हणून या शाळेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होत नाही. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-		दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८१७- ८१८ /२२.८.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७१७/२०११.

श्री. डॉ. एच. एस. कनोजे,
३७ बी, गांधी ले आऊट, जाफर नगर,
नागपूर - ४४० ०१३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा,
मुख्याध्यापक,
कादरिया हायस्कूल,
हसनबाग, नागपूर - ४४० ००९ . ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.८.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २२.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्रीमती पतंगे, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २८.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कादरिया हायस्कूल, हसनबाग, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन श्री. मुस्ताक मनसुरी, सहाय्यक शिक्षक यांचे नेमणूकीबाबत त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून मान्यतेबाबत अपूर्ण माहिती मिळाली म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

... २

३. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ५.४.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून दिनांक ७.५.१९९३ च्या आदेशान्वये जी मान्यता दिलेली आहे त्या मान्यते संबंधात कालावधी दिनांक २३.६.१९९२ ते परिविक्षा कालावधी असे नमुद केले आहे. मात्र त्यांच्या पुढील कालावधीची मान्यतेबाबत त्यांना माहिती मिळालेली नाही. म्हणून प्रस्तुत प्रकरणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांनी अपीलकर्त्यास त्यांचेकडील दिनांक ७.५.१९९३ च्या आदेशान्वये दिलेल्या मान्यते नंतर त्या पुढील मान्यता दिलेली आहे अगर कसे याची खात्री करुन माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तसेच त्यासंबंधात अपीलकर्त्याने सादर केलेल्या अनुभवाच्या प्रमाणपत्राची देखील खात्री करुन अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांनी त्यांच्या कार्यालयाकडे दिनांक ७.५.१९९३ च्या आदेशान्वये दिलेल्या मान्यते नंतर त्यांची पुढील मान्यता त्यांचे कार्यालयाने दिली किंवा नाही याबाबतची खात्री तसेच अनुभवाच्या प्रमाणपत्राची खात्री करुन अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८१९- ८२० /२२.८.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७१३/२०११.

श्री. गुलाब सोनबाजी खंडाळे,
मु. पो. खैरी (आकाशवाणी),
ता. कामठी, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सोमेश्वर मेश्राम,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

सौ. रमा शेषराव नेहारे,
जनमाहिती अधिकारी तथा,
मुख्याध्यापिका,
सरस्वती उच्च प्राथमिक शाळा,
ता. कामठी, जि. नागपूर. . ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.८.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २२.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सागितले की, त्यांनी दिनांक ८.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, सरस्वती उच्च प्राथमिक शाळा, कामठी यांच्याकडे माहितीचा अर्ज सादर करुन अपीलकर्त्यास २४ वर्षाच्या सेवेनंतर दुसऱ्यांदा उच्च वेतन घेण्याची संधी न मिळाल्याबाबतची माहिती त्यांनी

... २

मागितलेली होती. तथापी त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे दिनांक १७.१.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन त्यांनी दिनांक २५.१.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास सविस्तरपणे माहिती उपलब्ध करुन दिली असून सदरचे पत्र त्यांनी पोस्टाद्वारे अपीलकर्त्यास दिनांक २५.१.२०११ रोजी जावक क्रमांक ९३८ नुसार पाठविल्याचे सांगितले. सदरचे पत्र त्यांनी पोस्टाद्वारे पाठविल्याबाबतचा पुरावा आयोगासमोर दाखविला. तथापी सदरचे पत्र अपीलकर्त्यास अद्यापपर्यंत प्राप्त झाले नाही असे अपीलकर्त्याने आयोगासमोर सांगितले. म्हणून जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी आयोगासमोर अपीलकर्त्यास दिनांक २५.१.२०११ च्या पत्राने पाठवून दिलेली माहितीची पुन्हा एक जादा प्रत उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकृत केली.

४. अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध झाल्याने अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८२१- ८२२ /२२.८.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७१४/२०११.

श्री. भुषण भिमराव टेंभुर्णे,
विदर्भ हॉऊसिंग कॉलनी,
तकीया वार्ड, जिल्हा परिषद, चौक,
भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. मनोहर पवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
आरोग्य सेवा नागपूर मंडळ,
माता कचेरी, दिक्षाभूमी जवळ, नागपूर.

श्री. एन. एम. ठाकरे,
जनमाहिती अधिकारी तथा,
मुख्य प्रशासकीय अधिकारी,
आरोग्य सेवा नागपूर मंडळ,
माता कचेरी दिक्षाभूमी जवळ, नागपूर.. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.८.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २२.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ३०.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा नागपूर मंडळ, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर

करुन त्यांची आई श्रीमती सी. के. टेंभरे हया महिला मागासवर्गीय कर्मचारी असून त्यांना उशिरा कालबध्द पदोन्नती दिली त्याबाबत त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र मागितलेल्या माहितीचे संदर्भात शासन निर्णयाच्या प्रती त्यांना मिळाल्या नाही व दिनांक १८.५.२००६ रोजी पदोन्नती निवड समितीची सभा झाली त्या पदोन्नती निवड समितीमध्ये सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) यांचे वतीने उपस्थित असलेले प्रतिनिधींच्या नावाची माहिती त्यांना मिळाली नाही. म्हणून त्यांनी द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याच्या दिनांक ३०.१२.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक १०.१.२०११ राजी माहितीचे शुल्क भरण्याबाबत पत्र पाठविले. त्यानुसार अपीलकर्त्याने दिनांक ५.३.२०११ रोजी माहितीचे शुल्क भरले व दिनांक ५.३.२०११ रोजी अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली.

४. सदरची माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगापुढे मान्य केले. मात्र शासन निर्णयाच्या प्रती व पदोन्नती निवड समिती सभेत सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) यांचे वतीने हजर असलेले प्रतिनिधीचे नावाची त्यांना माहिती मिळाले नाही असे त्यांनी नमुद केले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, श्रीमती एस. एस. मडावी यांचे सेवा जेष्ठता यादीत नाव घेण्यात आले त्या संबंधात कोणतेही विशिष्ट असे शासन निर्णयाची प्रत त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही. तसेच दिनांक १८.५.२००६ रोजी पदोन्नती निवड समितीची सभा झाली त्या सभेतील कार्यवृत्तांतावर सहाय्यक संचालक यांच्या प्रतिनिधीची स्वाक्षरी आहे. मात्र त्यांचे नाव त्यामध्ये नमुद नाही. म्हणून स्वाक्षरी कोणाची आहे याबाबत माहिती घेऊन अपीलकर्त्यास त्यांची माहिती उपलब्ध करुन देण्यास जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे मान्य केले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ३

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हें अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे कळवावे की, श्रीमती एम. एस. मडावी यांचे नांव जेष्ठता यादीत घेण्याचे संबंधात कोणताही विशिष्ट असा शासन निर्णय त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही. तसेच दिनांक १८.५.२००६ रोजी झालेल्या पदोन्नती निवड समिती सभेला सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) यांचे वतीने हजर असलेल्या प्रतिनिधीचे नाव अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७१५/२०११.**

श्री. उज्जवलकुमार वासुदेवराव बागडे,
वार्ड नं. १७, ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती अर्चना मेंढे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, सावनेर, जि. नागपूर.

श्री. पी. आर. पांडे,
जनमाहिती अधिकारी तथा,
कनिष्ठ अभियंता,
नगर परिषद, सावनेर, जि. नागपूर.. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.८.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २२.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याने दिनांक २१.२.२०११ रोजी त्यांच्याकडे माहितीचा अर्ज सादर करुन मे. फ्रेड्स क्रियेटिव्ह सर्व्हिसेस, सावनेर प्रो. प्रा. राजु भुजाडे, सावनेर यांनी दिनांक १.६.२००८ ते दिनांक ३१.१२.२००८ पर्यंत नगर परिषद येथे मुरुम, डस्ट व गिट्टीबाबत जोडलेल्या

... २

(बिलासोबत) रायल्टी पास भरल्याच्या सर्व प्रती त्यांनी मागितलेल्या होत्या. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १५.३.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास माहितीच्या संदर्भात उत्तर पाठविले. तथापी त्या उत्तराने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील मुख्याधिकारी, नगर परिषद, सावनेर यांचेकडे दिनांक २४.३.२०११ रोजी दाखल केले. मुख्याधिकारी यांच्या प्रथम अपीलाचे निर्णयानुसार अपीलकर्त्यास पुन्हा दिनांक १५.४.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १५.३.२०११ चे पत्र व दिनांक १५.४.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८२६- ८२७ /२२.८.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६४२/२०११.

श्री. अमोल शंकरराव खांडेकर,
मु. पो. केळवद, ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

कु. जी. पी. नांदुरकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (कृषी),
पंचायत समिती, सावनेर, जि. नागपूर.

श्री. डी. एम. बोंडे,
जनमाहिती अधिकारी तथा,
सचिव,
ग्राम पंचायत, केळवर, ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.८.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ६.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापी त्या दिवशी सुनावणी होऊ शकली नाही म्हणून सदरची सुनावणी आज दिनांक २२.८.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर असून त्यांचे वतीने त्यांचे वडील श्री. शंकरराव खांडेकर हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांचे वडीलांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ३०.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, केळवद, ता. सावनेर यांच्याकडे माहितीचा अर्ज सादर करुन मालमत्ता क्रमांक ६९२ चे बाबत त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती मिळाली.

... २

परंतु सदरच्या मालमत्तेमध्ये किंती ब्लॉक आहेत याची माहिती त्यांना मिळाली नाही. तसेच सदरच्या माहितीबाबत अधिकृत माहिती म्हणून सत्यप्रतिलपी करुन त्यांना मिळाली नाही. तसेच त्या माहितीवर जावक क्रमांक नाही व तारीख नाही असे त्यांनी आयोगापुढे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ३०.११.२०१० चा माहितीचा अर्ज प्राप्त झाला होता व अपीलकर्त्यास दिनांक ३०.११.२०१० रोजी मालमत्ता क्रमांक ६९२ च्या संदर्भात कर आकारणीची प्रत व इतिवृत्ताची प्रत त्यांना देण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले. मात्र या माहितीच्या पत्रावर जावक क्रमांक नाही तसेच तारीख नाही. म्हणून आज पुन्हा आयोगासमोर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मालमत्ता क्रमांक ६९२ च्या संदर्भातील माहिती स्वाक्षरी करुन तसेच त्यासोबत पत्र तयार करुन ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकृत करुन समाधान व्यक्त केले.

४. अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांचेकडून आवश्यक ती माहिती उपलब्ध झाल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८२८- ८२९ /२२.८.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७२५/२०११.

श्री. हंसराज मारोतराव खानोरकर,
पी-८, मणी ले आऊट, राणाप्रतापनगर,
सिमेंट रोड, गोपालनगर, नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. सी. सुर्यवंशी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख,
नागपूर.

श्री. कमलाकर हट्टेकर,
जनमाहिती अधिकारी तथा,
नगर भूमापन अधिकारी क्रमांक ३,
नगर भूमापन कार्यालय, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.८.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २३.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २८.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्रमांक ३, नागपूर यांचे कार्यालयाकडे माहितीचा अर्ज सादर करुन गोपाल नगरच्या (खामला विभाग) मणी ले आऊट मधील भूखंड क्रमांक पी/८ श्री. मारोती कवडूजी पडोळे व श्री. हंसराज मारोतराव खानोरकर यांनी भूखंडाची आपसात समविभागणी करुन दिनांक ५ डिसेंबर १९८६ रोजी सब

... २

रजिस्ट्रारच्या कोर्टात रजिस्ट्री करवून घेतली. मात्र अभिलेखामध्ये क्षेत्रफळ कमी जास्त दाखविले म्हणून अभिलेखामध्ये चुकीची नोंद दुरुस्ती होण्याबाबत माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली व त्यामध्ये त्यांना असे कळविले की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ अन्वये संबंधित नोंदीवर जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख यांचेकडे अपील दाखल करावे अशी माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली. तथापी सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख यांचेकडे दिनांक १६.३.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयात देखील जनमाहिती अधिकारी यांनी कळविल्यानुसार अपील दाखल करण्यास त्यांना निर्देश देण्यात आले. मात्र अभिलेखाची दुरुस्ती झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २८.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. सदरच्या अर्जात अपीलकर्त्याने अभिलेखामध्ये चुकीची नोंद दुरुस्त होण्याबाबत कार्यवाही करुन माहिती मागितलेली होती. म्हणून अपीलकर्त्यास दिनांक २८.२.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली व त्या माहितीमध्ये अपीलकर्त्यास असे कळविले की, आपण फेरफार व पोटहिस्सा मोजणी करण्याबाबत आक्षेप घेतला आहे. तथापी त्यांचे कार्यालयात अभिलेखीत नोंद दुरुस्त करण्याचे अधिकार नाहीत. म्हणून त्यासाठी आपण जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख यांचेकडे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ अन्वये संबंधित नोंदीवर अपील दाखल करावे अशी माहिती अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, नागपूर यांचेकडे दाखल केले. त्या अपीलाची सुनावणी घेण्यात आली व त्यामध्ये असे दिसून आले की, अपीलकर्त्यास फेरफार व पोटहिस्सा मोजणी संबंधात त्यांचे आक्षेप आहे. त्यामुळे सदरचे फेरफार व पोटहिस्सा मोजणी संबंधात आक्षेपाबाबत अपीलकर्त्याने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ अन्वये संबंधित नोंदी विरुध्द अपील

दाखल केल्यास त्या अपीलावर नियमाप्रमाणे सुनावणी घेऊन निर्णय निर्गमित करण्यात येईल असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सुनावणीचे वेळी सांगितले. कारण अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही वैधानिक स्वरुपाची असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी कलम २४७ प्रमाणे अपील दाखल करुनच निर्णय देता येणे शक्य आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सुनावणीत नमुद केले.

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास प्लॉटच्या अभिलेखामध्ये चुकीची नोंद दुरुस्त करुन दुरुस्त अभिलेख त्यांना पाहिजे आहे. तथापी सदरच्या कार्यवाहीसाठी अपीलकर्त्याने जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, नागपूर यांचेकडे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील दाखल करणे संयुक्तिक होईल व सदरचे अपील दाखल झाल्यानंतर जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, नागपूर यांनी प्रस्तुत प्रकरणी सुनावणी घेऊन नियमाप्रमाणे अपीलाचा निर्णय देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकत्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना प्रस्तुत प्रकरणी फेरफार व पोटहिस्सा मोजणी करण्याबाबत त्यांचा जो आक्षेप आहे त्याला अनुसरुन महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ अन्वये जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, नागपूर यांचेकडे अपील दाखल करावे व सदरचे अपील दाखल झाल्यानंतर जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, नागपूर यांनी प्रस्तुत प्रकरणी सुनावणी घेऊन नियमानुसार योग्य तो निर्णय द्यावा.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८३०- ८३२ /२३.८.२०११

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६७७/२०११.

श्री. गिरीधारी बळीरामजी बांडाबुचे,
प्लॉट नं. १९, किर्तीनगर, न्यु नंदनवन,
नागपूर - ४४० ००९. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. सी. सुर्यवंशी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख,
नागपूर.

श्री. कमलाकर हट्टेकर,
जनमाहिती अधिकारी तथा,
नगर भूमापन अधिकारी क्रमांक ३,
नगर भूमापन कार्यालय, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.८.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापी त्या दिवशी सुनावणी होऊ शकली नाही म्हणून सदरची सुनावणी आज दिनांक २३.८.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २३.४.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्रमाक ३, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन शिट नं. ३२ मधील सिटी सर्व्हे नं. २०६६/१, मौजा जरिपटका येथील फेरफार नोंद व फेरफार अर्जाची प्रत बाबत माहिती ए, बी, सी, डी, ई

... २

एफ, जी अशी एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचे कडून दिनांक २१.५.२०११ रोजी उत्तर मिळाले व त्यामध्ये असे नमुद केले की, मौजा जरिपटका येथील न.भु.क्र. २०६६/११ या मोजणीबाबत २९९८ या फेरफार प्रकरणाबाबत दस्तऐवज उपलब्ध असून त्याचे शुल्क भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी. तसेच इतर मागणी केलेल्या माहितीचा शोध अभिलेखात घेणे सुरु असून प्राप्त होताच ती पुरविण्यात येईल असे त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी कळविले. तथापी त्यांना पुर्ण माहिती मिळाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याने मागणी केलेल्या माहितीचया संदर्भात त्यांच्या कार्यालयाकडे सर्व माहितीचा शोध घेण्यात आला व शोध घेतल्यानंतर अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जातील मुद्या क्रमांक ए, बी, डी, ई, इत्यादी माहिती त्यांना शोधून उपलब्ध झाली. म्हणून सदरच्या मुद्यांची माहिती आयोगासमोर अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली. तथापी अद्यापही अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक सी, एफ, जी या मुद्यांची माहिती अद्याप पर्यंत त्यांचे कार्यालयात उपलब्ध झाली नाही. तथापी सदरच्या माहितीचा शोध घेणे सुरु आहे. म्हणून अपीलकर्त्यास सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे समोर मान्य केले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक सी, एफ, जी याबाबतची माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा त्याबाबतची वस्तुस्थिती कळवावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-   दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८३३- ८३४ /२३.८.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६८४/२०११.**

श्री. माधव विश्वनाथ वैद्य,
द्वारा - श्री. वाय. डी. खरे, अनंत भवन,
टिकेकर रोड, धंतोली, नागपूर - ४४० ०१२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा न्यायाधिश -१,
जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर.

श्री. मोहम्मद नियाज,
जनमाहिती अधिकारी तथा,
प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.८.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १२.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापी त्या दिवशी सुनावणी होऊ शकली नाही म्हणून सदरची सुनावणी आज दिनांक २३.८.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, आजच्या त्यांच्या द्वितीय अपीलाचे सुनावणीचे वेळी तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी श्री. ए. एस. शिवनकर हे सुनावणीस हजर झाले नाही म्हणून त्यांनी त्याबाबत आयोगाकडे आक्षेप नोंदवून असे नमुद केले की, प्रस्तुत द्वितीय अपीलाचे सुनावणीस तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी श्री. ए. एस. शिवनकर यांनी हजर राहणे आवश्यक आहे. तथापी त्याबाबत आजच्या

सुनावणीस हजर झालेले जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर श्री. मोहम्मद नियाज यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा न्यायाधिश श्री. ए. एस. शिवनकर यांची नागपूर येथून बदली झाली असल्यामुळे ते सुनावणी उपस्थित राहू शकत नाही. त्यांचे ऐवजी जनमाहिती अधिकारी हेच त्यांचे वतीने आयोगासमोर बाजू मांडण्यास सक्षम असल्याचे प्रबंधक यांनी आयोगापुढे सांगितले. तथापी अपीलकर्त्याने श्री. ए. एस. शिवणकर यांच्या सुनावणीसाठी उपस्थितीचा आग्रह धरला व श्री. ए. एस. शिवनकर हे हजर नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी आयोगासमोर त्यांची कोणतीही बाजू न मांडता अपील सुनावणीच्या वेळी निघुन गेले.

३. जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १०.१२.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जामध्ये त्यांनी दाखल केलेल्या तक्रारी संबंधी तसेच न्यायाधिश, न्यायिक लिपिक व प्रबंधक यांचे विषयी मुद्या क्रमांक ए, बी, सी, डी, ई, एफ, जी इत्यादी मुद्यांवर दस्तऐवजांचे निरिक्षण व काही मुद्यांमधील माहिती त्यांनी मागितलेली होती. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ७.१.२०११ च्या पत्राने असे कळविले की, आपल्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक ए व बी च्या संदर्भात आवश्यक असलेले दस्तऐवज निरिक्षण करण्यासाठी या कार्यालयात उपस्थित राहावे. तसेच मुद्या क्रमांक सी ते ई ही माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ (जे) प्रमाणे ती देता येत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले. त्यानंतर अपीलकर्ता रेकॉर्डचे निरिक्षणासाठी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात दिनांक १०.१.२०११ रोजी हजर झाले. त्यांनी रेकॉर्डचे निरिक्षण केले व ९ पेजेसची माहिती त्यांनी घेतली असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील जिल्हा न्यायाधिश - १, नागपूर यांचेकडे दाखल केले. त्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २८.२.२०११ रोजी देण्यात आला व त्या निर्णयामध्ये अपीलकर्त्यास त्यांनी केलेलया तक्रारीच्या संर्दीाात जी गोपनीय चौकशी करण्यात आली होती त्या गोपनीय चौकशीच्या अहवालाची प्रत

अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले. प्रथम अपीलाचे निर्णयानुसार जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २३.३.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास दिनांक १.९.२००९ च्या गोपनीय चौकशीच्या अहवालाची प्रत उपलब्ध करुन दिली व सदरचा चौकशी अहवाल अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची पोहच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दाखविली.

५. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ७.१.२०११ च्या पत्राने सी ते ई पर्यंतची माहिती ही वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविले आहे. तथापी अपीलकर्त्याने मुद्या क्रमांक सी ते ई मध्ये जी माहिती मागितलेली आहे त्यातील काही माहिती कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या सेवापुस्तकामध्ये असल्याचे दिसून येते. म्हणून अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक सी ते ई या मुद्यांची माहिती सेवापुस्तकातील पहिल्या पानाची प्रत उपलब्ध करुन दिल्यास अपीलकर्त्यास सदरची माहिती उपलब्ध होऊ शकेल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक सी ते ई पर्यंतची माहिती ज्यांचे सेवापुस्तक जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे उपलब्ध आहे त्याच्या सेवा पुस्तकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने पाठवावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८३५- ८३७ /२३.८.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७२३/२०११.

श्री. रविकांत सुर्यकांतजी गाडरे,
द्वारा - विष्णु तेजरावजी खवशी, ए. पी. एम. सी. च्या मागे,
बस स्टॉपच्या मागे, ता. कारंजा (घा.) जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. जे. मडावी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
कारंजा (घा.), जि. वर्धा.

श्रीमती आर. बी. काळे,
जनमाहिती अधिकारी तथा,
कनिष्ठ लिपिक,
तहसील कार्यालय
कारंजा (घा.) जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.८.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २३.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १४.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, कारंजा (घा.) यांच्याकडे माहितीचा अर्ज सादर करुन तालुका भ्रष्टाचार निर्मुलन समिती, कारंजाची सभा नियमित घेण्यात आली नाही त्याबाबतची माहिती एकूण ११ मुद्यांवर मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र अपूर्ण माहिती प्राप्त झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील

तहसीलदार यांचेकडे दिनांक ५.१.२०११ रोजी दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. ... २



३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १४.९.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र तालुका भ्रष्टाचार निर्मुलन समितीच्या एप्रिल २०१० ते ऑगष्ट २०१० या महिन्यात सभा कां झाल्या नाही याची माहिती त्याना मिळाली नाही. तसेच माहितीच्या अर्जातील मुद्या क्रमांक ५ मध्ये किती तक्रार अर्ज प्राप्त झाले याची माहिती त्यांना मिळाली नाही व मुद्या क्रमांक ११ बाबत भ्रष्टाचार निर्मुलन समिती संबंधात शासन निर्णयाची प्रत त्यांना मिळाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या दिनांक १४.९.२०१० च्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी माहिती अर्जातील नमुद केलेल्या प्रमाणे तालुका भ्रष्टाचार निर्मुलन समितीच्या एप्रिल २०१० ते ऑगष्ट २०१० या महिन्यात सभा कां घेण्यात आल्या नाही याचे कारण किंवा त्याची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल. तसेच मुद्या क्रमांक ५ आणि ८ च्या संबंधात तालुका भ्रष्टाचार निर्मुलन समितीकडे प्राप्त झालेल्या तक्रारीची माहिती व मुद्या क्रमांक ११ मध्ये भ्रष्टाचार निर्मुलन समिती संबंधात शासन निर्णयाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ताचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास खालील माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

(१) माहे एप्रिल २०१० ते ऑगष्ट २०१० या कालावधीत तालुका भ्रष्टाचार निर्मुलन समितीच्या सभा कां झाल्या नाही त्यांची कारणे किंवा त्याबाबतची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळवावी.
(२) माहितीच्या अर्जातील मुद्या क्रमांक ५ व मुद्या क्रमांक ८ व ११ बाबत वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती **उपसचिव,**

**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८३८- ८३९ /२३.८.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७३०/२०११.

श्री. सुखचरण भैय्यालाल घिचरिया,
रेस्ट हाऊस जवळ (पुर्व दिशा),
मु. पो. ता. काटोल, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद, लघुसिंचाई विभाग,
नागपूर.

श्री. विजय बोंदरे,
जनमाहिती अधिकारी तथा,
सहाय्यक कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद लघु सिंचाई विभाग,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.८.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २४.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ६.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, लघु सिंचाई विभाग, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन माझी सेवा पुस्तकाची प्रमाणित प्रत देण्यात यावी अशी माहितीची मागणी केली होती. त्यांना जनमाहिती

अधिकारी यांचेकडून सेंवा पुस्तकाची झेरॉक्स प्रत मिळाली. परंतु त्यातील काही पेजेस हे अस्पष्ट असल्याबाबत त्यांनी नमुद केले. तसेच सेवा पुस्तक विलंबाने प्राप्त झाले असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

... २



३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ६.७.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १२.७.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती कनिष्ठ सहाय्यक श्री. भुसारी यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांचेकडे सदरचा अर्ज माहिती देण्यासाठी दिनांक १६.७.२०१० रोजी पाठविली. त्यानंतर अपीलकर्त्यास पाहिजे असलेल्या सेवापुस्तकाच्या प्रतीच्या झेरॉक्स काढण्यात आल्या व अपीलकर्त्यास दिनांक ५.८.२०१० च्या पत्राने माहितीचे शुल्क रुपये १५६/- भरण्याबाबत लेखी पत्राद्वारे कळविण्यात आले. तसेच पुन्हा अपीलकर्त्यास दिनांक १८.८.२०१० च्या पत्राने पुन्हा स्मरणपत्र देऊन माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आले. सदरचे दोन्ही पत्रे अपीलकर्त्यास पोस्टाद्वारे पाठविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले व त्याबाबतचे पोस्टाने पत्र पाठविलेला पुरावा आयोगासमोर दाखविले. तथापी सदरचे पत्र पोस्टाने प्राप्त झाले नाही असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले. मात्र त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दिनांक ३०.३.२०११ रोजी दाखल केले. मात्र सदरचे प्रथम अपील मुदतीत दाखल न केल्यामुळे अपीलाचा निर्णय दिला नाही. मात्र अपीलकर्त्यास दिनांक ८.४.२०११ च्या पत्राने जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या सेवापुस्तकाच्या प्रतीची मुळ सेवापुस्तकावरुन पडताळणी करावयाची असल्यास त्यांचे कार्यालयात उपस्थित राहावे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ८.४.२०११ च्या पत्राने कळविल्याचे दिसून येते.

४. त्यानंतर अपीलकर्ता दिनांक १४.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित झाले व त्यांनी त्यांच्या सेवापुस्तकांची छायांकितप्रतीचे शुल्क भरल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. सदरच्या सेवापुस्तकांच्या छायांकित प्रती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र त्या सेवापुस्तकातील ४ पेजेस हे अस्पष्ट असल्यामुळे पुन्हा नव्याने ४ पेजेस स्पष्ट स्वरुपात काढून देण्यात आले. ती माहिती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकृत केली.

५. अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी आवश्यक त्या माहितीचे शुल्काचा भरणा केल्यानंतर सेवापुस्तकांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

... ३



## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७३१/२०११.

श्री. रामसरण हरीराम ठाकूर,
प्लॉट नं. १५७, विजयनगर, कळमना मार्केट,
दुर्गाचौक, रामभुमी एजंसी, नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. मिलींद कुमार साळवे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपजिल्हाधिकारी, (राजस्व)
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.

श्रीमती स्नेहल टांकसाळे,
जनमाहिती अधिकारी तथा,
सहाय्यक अधिक्षक (राजस्व),
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.८.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २४.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे सुनावणीस गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २०.१.२०१० चा व दिनांक १०.९.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. सदरच्या माहितीमध्ये अपीलकर्त्याने मे. कन्हैया दाल मिल, श्री. कमलाकर पराये व श्री. राजू पराये यांचे विरुध्द सहाय्यक कामगार आयुक्त, नागपूर यांनी दिनांक २५.४.२००८ रोजी औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ कलम ३३ सी नुसार

... २

रुपये १,००,८००/- वसुलीचे प्रमाणपत्र दिलेले होते. त्याबाबतची कार्यवाही त्यांनी मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही तहसीलदार, नागपूर शहर यांचेशी संबंधित असल्याने तहसीलदार, नागपूर शहर यांचेकडे अपीलकर्त्याचा दिनांक २०.१.२०१० चा माहितीचा अर्ज दिनांक २८.१.२०१० च्या पत्राने कार्यवाहीसाठी पाठविला आणि त्याची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देऊन अपीलकर्त्यास तहसीलदार, नागपूर शहर यांचेशी संपर्क साधण्याबाबत कळविले. त्याला अनुसरुन तहसीलदार यांनी अपीलकर्त्यास वसुलीची कार्यवाही सुरु आहे असे कळविलेले आहे. त्यानंतर अपीलकर्त्याने पुन्हा दिनांक १०.९.२०१० रोजी माहितीचा अर्ज सादर करुन या वसुली प्रकरणाची कार्यवाही मागितली. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १८.९.२०१० च्या पत्राने सदरचा माहितीचा अर्ज पुन्हा तहसीलदार, नागपूर शहर यांचेकडे पाठवून अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत कळविले व त्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देऊन अपीलकर्त्याने तहसीलदार, नागपूर शहर यांचेशी संपर्क साधावा असे कळविले. त्यानंतर नायब तहसीलदार, नागपूर शहर यांनी अपीलकर्त्यास दिनांक ५.१०.२०१० च्या पत्राने अशी माहिती उपलब्ध करुन दिली की, थकीतदार मे. कन्हैय्या दाल मिल, चिखली ले आऊट, नागपूर यांचेकडील थकीत रक्कम रुपये १,००,८००/- वसुल करण्याबाबत प्रकरणात वसुलीची कार्यवाही सुरु आहे. थकीतदारास मागणीची नोटीस व जंगम मालमत्ता अटकावून ठेवण्याचे अधिपत्र तलाठयामार्फत पाठविण्यात आलेले आहे असे नायब तहसीलदार यांनी आयोगापुढे सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास माहिती अर्जातील माहिती वर नमुद केल्याप्रमाणे नायब तहसीलदार, नागपूर शहर यांनी उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८४३- ८४४ /२४.८.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७३२/२०११.**

श्री. गुरुदत्त जोगेन्द्रजी मेश्राम,
प्लॉट नं. ११८/११९, ताजकृपा भवन,
सौभाग्यनगर, सावरबांधे ले आऊट,
हुडकेश्वर रोड, नागपूर - ४४० ०३४. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. राजीव पिंपळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (उद्यान),
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.

श्री. सुधीर दुधे,
जनमाहिती अधिकारी तथा,
उद्यान अधिक्षक,
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.८.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २४.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १५.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उद्यान अधिक्षक, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन शुन्य मैल स्तंभ व हेरीटेज वास्तुबाबत एकूण १५ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक ८.३.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर त्यांना माहिती मिळाली, परंतु अपूर्ण माहिती मिळाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १५.१.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दिनांक १७.१.२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली व अपीलकर्त्यास दिनांक २०.१.२०११ च्या पत्राने माहितीचे शुल्क रुपये ६५/- भरण्याबाबत कळविण्यात आले. सदरचे पत्र जनमाहिती अधिकारी यांनी पोस्टाद्वारे पाठविल्याबाबतचा पूरावा आयोगासमोर दाखविला. मात्र अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील कार्यकारी अभियंता यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व प्रथम अपीलाचे निर्णयात असे नमुद केले की, अपीलकर्त्याने माहितीच्या शुल्काचा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी. त्यानंतर अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क रुपये ६५/- चा दिनांक १८.४.२०११ रोजी भरणा केला व त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २१.४.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २१.४.२०११ च्या पत्राने पाठविलेली माहिती त्यांना प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र मुद्या क्रमांक २ च्या संदर्भात लिजडिडची कॉपी त्यांना मिळाली नाही. तसेच मुद्या क्रमांक ४ च्या संदर्भात नकाशाची प्रत त्यांना मिळाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरच्या जागेचे कोणतीही लिजडिड त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे सदरच्या जागेचा नकाशा देखील त्यांचेकडे उपलब्ध नाही. म्हणून ही वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल. त्याकरिता अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मुद्या क्रमांक २ च्या संदर्भात लिजडिड केलेले नाही. तसेच मुद्या क्रमांक ४ च्या बाबत नकाशा देखील तयार केला नाही अशी माहिती स्पष्टपणे रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७३८/२०११.**

श्री. एम. जी. गंथाळे,
द्वारा - श्रीमती सुशिलाबाई गो. गंथाळे,
वार्ड क्र. १५ ते ३० च्या मागे,
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संचालनालय,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
शासकीय दंत महाविद्यालय इमारत,
सेंट जॉर्ज हॉस्पीटल कंपाऊंड, मुंबई - १.

श्री. युवराज सोनवणे,
जनमाहिती अधिकारी तथा,
प्रशासकीय अधिकारी,
संचालनालय,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
शासकीय दंत महाविद्यालय इमारत,
सेंट जॉर्ज हॉस्पीटल कंपाऊंड, मुंबई - १. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.८.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २५.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

... २

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ११.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन त्यांनी माहे जानेवारी, फेब्रुवारी व मार्च २०१० चे वेतन अदा न केल्याबाबत त्यांनी केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या चौकशीच्या अहवालाची प्रत मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांचेकडून चौकशी समितीच्या अहवालाची प्रत प्राप्त झाली. मात्र त्या चौकशी अहवालासोबत कार्यालयीन टिपणीची प्रत त्यांना प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना मिळाली नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ११.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दिनांक १६.११.२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अपीलकर्त्यास दिनांक २२.११.२०१० रोजी माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार अपीलकर्त्याने दिनांक १४.१२.२०१० रोजी माहितीचे शुल्क भरले व अपीलकर्त्यास दिनांक १६.१२.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली व त्यामध्ये असे नमुद केले की, अपीलकर्त्याने अर्जामध्ये नमुद केलेले अर्ज हे अधिष्ठातांमार्फत त्यांचेकडे प्राप्त झाले नाहीत. तरी सुध्दा संचालनालयाचे दिनांक ८.७.२०१० चे पत्र अपीलकर्ता यांच्या दिनांक १०.६.२०१० रोजीच्या निवेदनावर सविस्तर माहिती अधिष्ठाता यांच्या अभिप्रायासह मागितलेली आहे. तसेच अपीलकर्ता यांना वेतन अदा करण्याबाबतची सद्य:स्थिती त्यांना कळविण्याचेही अधिष्ठाता यांना दिलेल्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास पाठविण्यात आल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील सहसंचालक यांचेकडे दिनांक २४.२.२०११ रोजी दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १६.३.२०११ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिला व अपीलकर्त्यास त्यांच्या तक्रारीच्या संदर्भात चौकशीच्या अहवालाची प्रत व इतर कागदपत्रे जनमाहिती अधिकारी इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांनी अपीलकर्त्यास त्वरित उपलब्ध करुन द्यावे असा निर्णय प्रथम अपीलात देण्यात आला. त्यानंतर जनमाहिती अधिकारी इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांनी अपीलकर्त्यास दिनांक २७.६.२०११ च्या पत्राने चौकशी समितीच्या अहवालाची प्रत

उपलब्ध करुन दिली. सदरच्या चौकशी अहवालाची प्रत अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र सदरच्या चौकशीच्या अहवालाच्या संदर्भात कार्यालयीन टिपणीची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही असे त्यांनी आयोगापुढे नमुद केले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास या चौकशीच्या अहवालाचे संदर्भात कार्यालयीन टिपणीची प्रत उपलब्ध असल्यास ती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी चौकशीच्या अहवालाच्या संदर्भात कार्यालयीन टिपणीची प्रत जनमाहिती अधिकारी इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांचेकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तिशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. तथापी सदरच्या चौकशीच्या संदर्भात कार्यालयीन टिपणीची प्रत उपलब्ध नसल्यास तसे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८४७- ८४९ /२५.८.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७४१/२०११.**

श्री. विजय प्रभाकर कावरे,
जुनी मंगळवारी, गुजरी चौक,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. विजय मून,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी व सक्षम अधिकारी,
नागरी जमीन कमाल धारणा,
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.

श्री. व्ही. आर. सुरडकर,
जनमाहिती अधिकारी तथा,
कनिष्ठ लिपिक,
नागरी जमीन कमाल धारणा,
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.८.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २५.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २५.२.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा नागरी जमीन कमाल धारणा, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन खसरा क्रमांक २७ ते ४०/२ अंतर्गत तळेगांव दाभाडे भुखंड विकास योजना मंजूर करण्यात आली होती. त्या योजने अंतर्गत शासनाचा हिस्सा

... २

म्हणून ११९५२.०० चौ.मी. जमीन या कायद्यांतर्गत शासनाकडे प्राप्त झाली होती. त्या जमीनीच्या संदर्भात काही जमीनधारकांपैकी त्याच्या हिस्स्यातील ७९६८ चौ.मी. जमीनीचे शासनास विनामुल्य प्राप्त झालेले क्षेत्र मुल्यांकनाऐवढी किंमत शासन जमा करण्याचे अटीवर ती जमीन परत मिळण्याबाबत प्रस्ताव तयार झाला होता व त्याबाबत दिनांक ५.७.२००४ रोजीच्या आदेशाने सदरची जमीन मुळ जमीनधारकांना परत करण्याचे आदेश दिले होते. त्या आदेशाची प्रत व त्यासंदर्भातील कागदपत्रांची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचे कडून दिनांक ५.७.२००४ च्या आदेशाची छायांकित प्रत मिळाली. मात्र मुळप्रत उपलब्ध झाली नाही. तसेच त्या आदेशाच्या संदर्भात असलेल्या कागदपत्रांच्या प्रती देखील त्यांना मिळालेल्या नाहीत म्हणून त्यांनी प्रथम अपील अपर जिल्हाधिकारी, नागरी जमीन कमाल धारणा, नागपूर यांचेकडे दिनांक २५.३.२०११ रोजी दाखल केले होते. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २५.२.२०११ चा माहितीचा अर्ज प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध त्यांचे कार्यालयात घेण्यात आला. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहितीची मुळ नस्ती आढळून आली नाही. मात्र यासंदर्भात त्यांचे कार्यालयाकडून दिनांक ५.७.२००४ रोजी जो आदेश निर्गमित केलेला आहे त्याची छायाप्रत त्यांना उपलब्ध झाली. मात्र त्या आदेशाची मुळप्रत उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्त्यास दिनांक २३.३.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली व त्यामध्ये असे नमुद केले की, प्रस्तुत प्रकरणात तत्कालीन सक्षम प्राधिकारी यांनी दिनांक ५.७.२००४ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये त्यांना तळेगांव दाभाडे योजनेतील शासनाच्या ११९५२.०० चौ.मी. क्षेत्र विनामुल्य प्राप्त झाल्याबाबत नोंदी असलेल्या या आदेशाची झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगापुढे मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, दिनांक ५.७.२००४ च्या आदेशाची मुळप्रत त्यांना पाहिजे आहे व त्या आदेशा सोबत इतर कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती देखील त्यांना पाहिजे आहेत. आजच्या सुनावणीस उपस्थित असलेले प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी यांनी देखील आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, प्रस्तुत प्रकरणाची

मुळ नस्तीचा त्यांचे कार्यालयात शोध घेण्याचा प्रयत्न केला. तथापी या प्रकरणाची मुळ नस्ती त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध झालेली नाही म्हणून अपीलकर्त्यास दिनांक ५.७.२००४ च्या आदेशाची झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच त्या आदेशासोबत इतर कागदपत्रे देखील त्यांचे कार्यालयात उपलब्ध झालेली नाही असे त्यांनी आयोगास सांगितले.

४. म्हणून प्रस्तुत प्रकरणात जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे कळवावे की, तत्कालीन सक्षम प्राधिकारी यांनी दिनांक ५.७.२००४ रोजी पारित केलेल्या मुळ आदेशाची प्रत त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध नाही. तसेच त्या आदेशासोबत मुळ कागदपत्रे देखील उपलब्ध नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास हा आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत वर नमुद केल्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी पोस्टाने अपीलकर्त्यास विनामुल्य कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८५०- ८५२ /२५.८.२०११

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७४०/२०११.**

श्री. शालिकराम तानबाजी बोरकर,
शांतीनगर हाऊसिंग कॉलनी,
क्वा. नं. एल. आय. जी. ए-५,
नागपूर - ४४० ००२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त (मुख्यालय),
पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती.

श्री. एम. ए. क्षिरसागर,
जनमाहिती अधिकारी तथा,
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.८.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २५.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ३.३.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन श्री. रामदास नत्थुजी वंजारी, पोलीस निरिक्षक यांचे नेमणुकीचे संदर्भात तसेच त्यांचे पदोन्नतीच्या संदर्भात व त्यांना देण्यात येणाऱ्या वेतन व भत्त्याचे संदर्भात माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जनमाहिती

... २

अधिकारी यांनी सदरची माहिती ही वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार देता येत नाही असे कळविले. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ३.३.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक ८.३.२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने माहिती देण्याबाबत त्रयस्थ पक्षाचे लेखी विचारणा करण्यात आली. तथापी त्रयस्थ पक्षाने दिनांक ११.४.२०११ रोजी त्यांची वैयक्तिक माहिती देण्यात येऊ नये असे कळविले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ११.४.२०११ रोजी सदरची माहिती ही वैयक्तिक असल्यामुळे देता येत नाही असे अपीलकर्त्यास कळविले असल्याचे त्यांनी सुनावणीत आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने श्री. रामदास नत्थुजी वंजारी, पोलीस निरिक्षक यांच्या नेमणुकीच्या संदर्भात तसेच पदोन्नतीच्या संदर्भात इतर माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात सेवा पुस्तकामध्ये नेमणूकीच्या व पदोन्नतीच्या नोंदी असतात. तसेच अपीलकर्त्याने श्री. रामदास नत्थुजी वंजारी यांची सन १९६८ पासून नेमणुकी संदर्भात माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती ही सेवापुस्तकात सुलभरित्या उपलब्ध होऊ शकते ही बाब लक्षात घेता जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास स्पष्टपणे झेरॉक्स प्रती माहितीचे शुल्क भरुन घेऊन उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

... ३

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हें अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसात जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास श्री. रामदास नत्थुजी वंजारी, पोलीस निरिक्षक यांच्या सेवापुस्तकाची छायांकित प्रती अपीलकर्त्याकडून शुल्क भरुन घेऊन उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरणा करुन वर नमुद केल्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८५३- ८५५ /२५.८.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७४६/२०११.

श्री. प्रभाकर जनार्दन काळे,
प्लॉट नं. २, शिल्पनिकेंत, नाईक ले आऊट,
सुभाषनगर, नागपूर - ४४० ०२२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती प्रणाली चिटणीस,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव (पदुम-१),
पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२.

श्री. द. लोंढे,
जनमाहिती अधिकारी तथा,
कक्ष अधिकारी,
पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.८.२०११)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २६.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तुत प्रकरणी कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

... ३

३.	तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २४.१२.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कक्षाकडे दिनांक २७.१२.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरच्या संबंधित स्वीय सहाय्यकांच्या पदाविषयी एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही संकलीत करण्यात आली व अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात माहिती व्यक्तिश: घेणार असे नमुद केल्यामुळे अपीलकर्त्यास दिनांक ११.१.२०११ च्या पत्राने माहिती घेण्यासाठी दिनांक १५.१.२०११ रोजी मंत्रालयात हजर राहावे असे कळविण्यात आले. सदरचे पत्र जनमाहिती अधिकारी यांनी पोस्टाद्वारे अपीलकर्त्यास दिनांक ११.१.२०११ रोजी पाठविल्याबाबत जावक रजिस्टरचा पुरावा आयोगासमोर दाखविला यावरुन असे दिसून आले की, अपीलकर्त्यास दिनांक ११.१.२०११ रोजी पत्र पाठविले आहे. तथापी अपीलकर्ता जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक १५.१.२०११ रोजी माहिती घेण्यासाठी हजर झाले नाही. म्हणून त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध करुन देता आली नाही.

४.	मात्र त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपसचिव यांचेकडे दिनांक २८.१.२०११ रोजी दाखल केले. त्याप्रमाणे अपीलाची सुनावणी उपसचिव यांनी दिनांक १७.२.२०११ रोजी घेतली. तथापी त्यावेळी अपीलकर्ता हे स्वत: सुनावणीस हजर झाले नाही. मात्र त्यांचे वतीने श्री. मनोज बबनराव देवगीकर हे सुनावणीस हजर होते. त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलाचे सुनावणीचे वेळी अपीलकर्त्याने मागितलेल्या एकूण ४ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिली. त्यामध्ये मुद्या क्रमांक १ व २ या संबंधातील कागदपत्रे देण्यात आली व मुद्या क्रमांक ३ व ४ च्या संदर्भात कागदपत्रे उपलब्ध नाही अशी वस्तुस्थिती त्यांना कळविण्यात आली. सदरची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी श्री. मनोज बबनराव देवगीकर यांना प्रत्यक्ष प्रथम अपीलाचे सुनावणीचे वेळी दिली व सदरची माहिती त्यांना प्राप्त झाल्याबाबतची पोहच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दाखविली.

५.	जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दिनांक २४.१२.२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलाचे सुनावणीचे वेळी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६८७/२०११.

श्री. घनश्याम जयनारायण ब्रजपुरिया,
गुजरी बाजार, ता. कामठी, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डी. के. बेदरकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,
ता. कामठी, जि. नागपूर.

श्री. महादेवराव मामीलवार,
जनमाहिती अधिकारी तथा,
सचिव,
श्री शिव गृह निर्माण सहकारी संस्था, रनाळा,
जी. एन. रोड, नया गोदाम, ता. कामठी, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.८.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १२.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापी त्या दिवशी सुनावणी होऊ शकली नाही म्हणून सदरची सुनावणी आज दिनांक २६.८.२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ७.१.२०११ रोजी सचिव, शिव गृहनिर्माण सहकारी संस्था, ता. कामठी यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन श्री शिव गृह निर्माण सहकारी संस्था मर्यादित, रनाळा, ता. कामठी या संस्थेविषयी माहिती मागितलेली होती. त्यांना संस्थेकडून अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

... २

३. जनमाहिती अधिकारी तथा सचिव, श्री शिव गृह निर्माण सहकारी संस्था मर्यादित, रनाळा व प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, कामठी यांनी आयोगापुढे सांगितले की, सदरच्या गृह निर्माण सहकारी संस्थेला शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त झाले नाही किंवा शासनाची जमीन देखील या संस्थेस मिळाली नाही. म्हणून सदरच्या संस्थेस माहितीच्या अधिकाराच्या तरतुदी हया लागू होत नाही. तथापी माहिती अर्जातील संस्थेच्या दिनांक २९.४.२००४ च्या सभेच्या इतिवृत्ताची प्रत अपीलकर्त्यास आयोगासमोर सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, कामठी यांनी संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकृत केली.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर सदरच्या संस्थेला शासनाकडून कोणतेही अर्थसहाय्य प्राप्त झाले नाही किंवा शासनाकडून जमीन देखील या संस्थेला मिळाली नाही. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी हया संस्थेस लागू होत नाही. तथापी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांनी सहकारी कायद्यातील तरतुदीनुसार संस्थेच्या सचिवाकडून वर नमुद केल्याप्रमाणे माहिती प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास आयोगासमोर उपलब्ध करुन दिली. त्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८५९- ८६० /२६.८.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७४८/२०११.

श्री. सुधाकर केशवराव बागडे,
हाऊसिंग बोर्ड कॉलनी, बस स्टॅन्ड मागे,
ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, पारशिवनी, जि. नागपूर.

श्री. व्ही. पी. कांबळे,
जनमाहिती अधिकारी तथा,
सचिव,
ग्राम पंचायत, चारगांव,
ता. पारशिवनी, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.८.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.४.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २६.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. एम. जी. काकडे, विस्तार अधिकारी (पंचायत) हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २७.११.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन सन २००८-२००९ या वर्षात चारगांव येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत सिमेंट रोडचे बांधकाम करण्यात आले त्या बांधकामाचे आदेश पत्रकाची प्रत, एम.बी. अहवालाची

प्रत अशी माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यांना ३० दिवसांचे मुदतीत जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, पारशिवनी यांचेकडे दिनांक २१.१.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले व ३० दिवसांत त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांचे विरुध्द शास्तीची कार्यवाही करावी अशी मागणी त्यांनी आयोगापुढे केली.

३. जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २७.११.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक १४.१.२०११ च्या पत्राने माहिती दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र सदरची माहिती ३० दिवसात दिली नाही व दिलेली माहिती ही चुकीची दिली आहे असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी व विस्तार अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्यास दिनांक १४.१.२०११ च्या पत्राने जी माहिती पाठविली आहे त्या संदर्भात त्यांनी असा खुलासा केला की, चारगांव ग्रामपंचायत ही गटग्रामपंचायत असून हया ग्रामपंचायत मध्ये चारगांव, भिवगड, आवळेघाट व बफेरा अशा चार गावांचा समावेश आहे. चारगांव ग्रामपंचायतला सन २००८-२००९ मध्ये दलित वस्ती सुधारणा निधी जिल्हा परिषदकडून मंजूर झाला होता. तथापी चारगांव येथे दलित वस्ती नाही म्हणून ते काम झाले नाही. म्हणून ते काम आवळेघाट येथे झालेले आहे व त्याबाबतची माहिती त्यांनी आयोगासमोर अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली.

४. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या दिनांक २७.११.२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यानंतर दिनांक १४.१.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी ती माहिती देखील अपूर्ण उपलब्ध

करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर आयोगासमोर अपीलकर्त्यास पुन्हा माहिती उपलब्ध करुन दिली. यावरुन असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ३० दिवसांचे मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून माहितीच्या विलंबाबद्यल जनमाहिती अधिकारी हे दोषी दिसून येतात. त्यांना विलंबाबद्यल खुलासा विचारला असता त्यांनी असे सांगितले की, ग्रामपंचायतच्या कार्यबाहुल्यामुळे ते ३० दिवसांचे मुदतीत माहिती उपलब्ध करुन देऊ शकले नाही. तथापी जनमाहिती अधिकारी यांचा खुलासा मान्य करण्या सारखा नाही म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, चारगांव यांनी अपीलकर्त्याच्या दिनांक २७.११.२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन ३० दिवसाचे मुदतीत वर नमुद केल्याप्रमाणे कोणतीही माहिती दिलेली नाही म्हणून विलंबाबद्यल जनमाहिती अधिकारी हे दोषी दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये २०००/- शास्तीची कार्यवाही लादण्यात येत आहे.

३) सदरच्या शास्तीची रक्कम संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, पारशिवनी यांनी जनमाहिती अधिकारी यांचे दरमहाचे वेतनातून कपात करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७४७/२०११.

श्री. गुलजार उस्मान कुरेशी,
मु. डोंगरताल, कब्रस्थान व लाला दिवान दर्गाह,
पो. देवलापार, ता. रामटेक, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधिक्षक,
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर.

श्री. के. एच. आदेवार,
जनमाहिती अधिकारी तथा,
उपविभागीय पोलीस अधिकारी,
रामटेक विभाग, ता. रामटेक, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.८.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २६.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक ५.४.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन मुख्य दर्ग्याचे अतिक्रमण काढून महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांच्या पत्राप्रमाणे जागेचा ताबा घेण्यासाठी पोलीस

यंत्रणेची मदत मागण्यात आली.  तथापी पोलीस यंत्रणेने कां मदत दिली नाही याची माहिति त्यांनी मागितलेली होती.  त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १७.४.२०११ च्या पत्राने असे कळविले की, वक्फ बोर्डाचे

... २



आदेशाविरुध्द जिल्हा न्यायालय, नागपूर येथे केस टाकलेली आहे.  त्याचा अद्याप निर्णय झालेला नाही म्हणून आपणास दर्गा व कब्रस्तानचे जागेबाबत मदत देता येऊ शकली नाही असे त्यांना कळविण्यात आले.  म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३.    जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी आयोगापुढे सागितले की, अपीलकर्त्याचा दिनांक ५.४.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता.  अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ठाणेदार, देवलापार यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यात आली व अपीलकर्त्यास दिनांक १७.४.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली.  त्यामध्ये अपीलकर्त्यास असे कळविण्यात आले की, मौजा डोंगरताल येथे आला हजरत अली बक्शबाबा लाल दिवान शहा दरगाह ची देखभाल श्री. सुंदरलाल ताकोत हे करीत आहे व त्यांनी सदर दर्गा कमेटी तयार केलेली आहे त्याचा नोंदणी क्रमांक २१५०/२००८ असा आहे.

४.    आपण सदर दरगाह व कब्रस्थान ताब्यात देण्यात यावे यासाठी पोलीस मदतची मागणी सुध्दा केलेली आहे.  परंतु आला हजरत अली बक्श बाबा लाल दिवान शहा ट्रस्ट ही दर्गाची देखरेख करीत आहे व सदर ट्रस्टचे अध्यक्ष श्री. सुंदरलाल ताकोद, रा. डोंगरताल हे आहेत.  त्यांनी बयानात सांगितले की, वक्फ बोर्डाचे आदेशाविरुध्द जिल्हा न्यायालय, नागपूर येथे केस टाकलेली आहे व अजूनपर्यंत निर्णय झालेला नाही.  म्हणून पोलीस मदत दर्गा व कब्रस्तानचे जागेबाबत मदत देता येऊ शकली नाही.  अशी माहिती अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १७.४.२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे असे दिसून येते.

५.	अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने वर नमुद केल्याप्रमाणे त्यांना पोलीस मदत कां देण्यात आली नाही याची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ३



## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हें खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-		दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८६४- ८६६ /२६.८.२०११

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७५९/२०११.

श्री. चक्रधर तुकडूजी राऊत,
मु. शेगांव, वार्ड नं. ५, बाजारपेठ,
ता. आरमोरी, जि. गडचिरोली. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, आरमोरी, जि. गडचिरोली.

श्री. ए. एन. डाखरे,
जनमाहिती अधिकारी तथा,
सचिव,
ग्राम पंचायत आरमोरी,
ता. आरमोरी, जि. गडचिरोली. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.८.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २७.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. एन. एस. बोकडे, कक्ष अधिकारी हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक २२.१२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी  तथा सचिव, ग्राम पंचायत, आरमोरी, जि. गडचिरोली यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन त्यांच्या जागेची मौका चौकशी संबंधात तसेच श्री. मारोती चेपटू दुरबुडे यांचेकडील नमुना ८ ची प्रत, जागा मोजण्याच्या

... २



नियमाची प्रत, तसेच नमुना ८ च्या नोंदी घेण्याचे संदर्भात नियमाची प्रत, इत्यादी बाबत एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली होती.  त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २०.१.२०११ च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली.  तथापी त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, आरमोरी यांचेकडे दिनांक १४.२.२०११ रोजी दाखल केले.  प्रथम अपीलाचा निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

३.	जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २२.१२.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता.  अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली होती.  त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक २०.१.२०११ च्या पत्राने ५ मुद्यांची मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली.  सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगापुढे मान्य केले.  मात्र अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांच्या घराचे व सांदवाडीचे जागेबाबत अन्य व्यक्तिने तक्रार केलेली आहे त्या तक्रारीची प्रत त्यांना मिळालेली नाही.  तसेच सदरच्या तक्रारीचे संदर्भात ग्रामपंचायत कार्यालयाकडून त्यांना दिनांक २९.१२.२०१० रोजी मौका चौकशीच्या संदर्भात नोटीस पाठविण्यात आले होते. त्या नोटीसची प्रत अपीलकर्त्याने आयोगासमोर दाखविली व या तक्रारीचे प्रत त्यांना पाहिजे आहे असे त्यांनी आयोगापुढे नमुद केले.

४.	अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २२.१२.२०१० च्या

माहिती अर्जाला अनुसरुन दिनांक २०.१.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी अपीलकर्त्यास त्यांच्या घराचे व सांदवाडीचे जागेबाबत ग्रामपंचायत व त्रयस्थ व्यक्तीने केलेल्या तक्रारीची प्रत उपलब्ध करुन देणे न्यायोचित होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ३



## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचे घराचे व सांदवाडीचे जागेबाबत ग्रामपंचायत कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीची छायांकित प्रत विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७६०/२०११.

श्री. सारंग भाऊराव दाभेकर,
द्वारा - श्री. सतिश शंकर सिडाम,
गांधी वार्ड, ता. चिमूर, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. भगत,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय व्यवस्थापक,
वन विकास महामंडळ मर्यादित,
पश्चिम चांदा, वन प्रकल्प विभाग,
ता. जि. चंद्रपूर.

श्री. टी. एम. दुर्गे,
जनमाहिती अधिकारी तथा,
सहाय्यक व्यवस्थापक,
वन विकास महामंडळ मर्यादित,
पश्चिम चांदा, वन प्रकल्प विभाग,
ता. जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.८.२०११)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २७.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक-१, वन विकास महामंडळ मर्यादित, कोळसा, चंद्रपूर यांचेकडे सन २००९ ते २०११ या कालावधीत केलेल्या कामाच्या

... २



माहिती बाबत एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.२०११ रोजी शपथपत्रावर राज्य माहिती आयोगाकडे निवेदन सादर केले आहेत. त्यात वरील ६ मुद्यांची माहिती प्राप्त झाल्यामुळे समाधान झाले आहे. त्यामुळे सदरचे अपील हे मागे घेत आहे असे लेखी शपथपत्र सादर केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७६७/२०११.

श्री. प्रा. अरुण प्रल्हाद उराडे,
आशीर्वादनगर, वार्ड नं. २२,
चामोर्शी रोड, जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधिक्षक,
जि. गडचिरोली.

श्री. अजित बोऱ्हाडे,
जनमाहिती अधिकारी तथा,
उपविभागीय पोलीस अधिकारी,
जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.८.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २७.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. डी. जे. चव्हाण, पोलीस निरिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्याचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

३. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक २३.३.२०११ चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २८.३.२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने सदरच्या माहिती संदर्भात उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेकडील दिनांक

... २

२.१२.२००९ नुसार इस्तेगासा क्रमांक ९४/०८, दिनांक २६.३.२००८ ला तोंडी रिपोर्ट, बयान, एन.सी. रिपोर्टच्या सत्यप्रती जोडलेल्या होत्या. परंतु मुळ तक्रारीची सत्यप्रत जोडलेली नव्हती. तरी मुळ तक्रारीची सत्यप्रती त्यांनी मागणी केली होती. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ३.४.२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली व त्यामध्ये असे नमुद केले की, श्री. स्वप्नील अरुण उराडे यांनी दिलेल्या तक्रारीवर पोलीस स्टेशन, गडचिरोली येथे अदखलपात्र गुन्हा क्रमांक १३८/२००८ कलम ३२३, ५०४ व ५०६ भा.दं.वि. प्रमाणे दाखल करण्यांत आला असून पोलीस स्टेशन, गडचिरोली इस्तेगासा क्रमांक ९४/२००८ कलम १०७, ११६(३) सी. आर. पी. सी. प्रमाणे तयार करुन सदरचा इस्तेगासा तालुका दंडाधिकारी, गडचिरोली येथे दाखल करण्यांत आला. सदरच्या इस्तेगासासोबत श्री. स्वप्नील अरुण उराडे यांनी दिलेली तक्रार व साक्षीदाराचे बयाण जोडण्यांत आले आहे. सदरच्या तक्रारीची दुय्यमप्रत आमच्याकडे उपलब्ध नाही. अर्जदाराच्या तक्रारीची नोंद अदखलपात्र गुन्हयाचे रजिस्टरमध्ये घेऊन त्यावर अर्जदाराची सही घेण्यांत आली आहे. अशी माहिती अपीलकर्ता यांना देण्यात आल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील अपर पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांचे कार्यालयाकडे दिनांक ५.४.२०११ रोजी दाखल केले. या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १८.४.२०११ रोजी देण्यात आला व त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी १० दिवसांत अपीलकर्त्याने मागितलेल्या मुळ तक्रारीची प्रत उपलब्ध करुन देण्याकरिता संबंधित कार्यालयाकडे पत्रव्यवहार करावा असा निकाल दिला असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने हजर असलेले पोलीस निरिक्षक यांनी आयोगापुढे सांगितले.

४. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर जनमाहिती अधिकारी यांनी तहसीलदार, गडचिरोली यांचेकडे दिनांक २०.४.२०११ रोजी पत्र लिहून सदरच्या इस्तेगासासोबत असणारी मुळ तक्रारीची प्रत मागणी केली. त्याला अनुसरुन तहसीलदार, गडचिरोली यांनी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेकडे दिनांक ३.५.२०११ च्या पत्राने असे कळविले की, सदरचा इस्तेगासा क्रमांक ९४/२००८ चा शोध घेतला असता त्यांच्या कार्यालयात ते दस्तऐवज आढळून येत नाही असे त्यांनी कळविले. तसेच तहसीलदार, गडचिरोली यांनी सदरच्या पत्रात असे नमुद केले की, राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचेकडील अपील क्रमांक ४३५/२०१० मधील निर्णय दिनांक २५.५.२०१० च्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या

संदर्भामध्ये कागदपत्रे गहाळ झाल्याबाबत संबंधित पोलीस स्टेशनमध्ये एफ.आय.आर. दाखल करावा असे आदेशित केलेले आहे. त्या आदेशाला अनुसरुन दिनांक १०.७.२०१० रोजी पोलीस स्टेशन, गडचिरोली येथे एफ. आय. आर. दाखल करण्याकरिता पत्र देण्यांत आलेले आहे. त्यानुसार पोलीस स्टेशन, गडचिरोली यांनी त्यांचेकडील गहाळ झालेल्या मालाचे रजिस्टरमध्ये या तक्रारीची नोंद अ.क्र. ३१५ वर घेतलेली आहे असे तहसीलदार, गडचिरोली यांनी कळविलेले आहे. म्हणून प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्त्याने मागणी केलेल्या मुळ तक्रारीची प्रत उपलब्ध होत नाही असे तहसीलदार यांनी कळविल्यामुळे पुन्हा जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ११.५.२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास आपण मागणी केलेल्या मुळ तक्रारीची प्रत उपलब्ध होत नाही असे कळविलेले आहे असे दिसून येते.

५. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दिनांक २३.३.२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ३.४.२०११ च्या पत्राने व दिनांक ११.५.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हें खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७६६/२०११.

श्री. दिनेश बनारशीलालजी अग्रवाल,
मु. पो. ता. सडक/अर्जुनी,
जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. ह. र. शेंडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
जि. भंडारा.

श्री. डी. के. टेंभुर्णे,
जनमाहिती अधिकारी तथा,
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, लाखांदूर,
ता. लाखांदूर, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.८.२०११)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.३.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २७.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता यांचे तर्फे श्री. ओ. एस. गहाणे, वकील हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्त्याचे वकीलांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १०.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लाखांदूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर

... २

करुन सन २००९-२०१० मध्ये सार्वजनिक बांधकाम उपविभाग, लाखांदूर करिता नॉनप्लॉन गट अ अतिरिक्त कार्यक्रमासहित मंजूर झालेल्या कामांची किंमतीसह यादी. तसेच कामांचे कार्यारंभ आदेशाची प्रत, तसेच कामांचे निविदा प्रक्रियेची संपूर्ण माहिती इत्यादी माहिती मागितलेली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून ३० दिवसांचे मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता (सु. व स) यांचेकडे दिनांक २४.१०.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपील दाखल केल्यानंतर त्यांना माहिती प्राप्त झाली. मात्र सदरच्या माहितीमध्ये फक्त ४४ पेजेसची माहिती प्राप्त झाली. प्रत्यक्षात माहितीचे पेजेस ६० आहेत. बाकी माहिती त्यांना प्राप्त झाली नाही असे वकीलांनी आयोगापुढे सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १०.८.२०१० चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला नाही. सदरचा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला नसल्याबाबत त्यांनी आयोगापुढे आवक नोंदवही दाखविली. आवक नोंदवहीमध्ये अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज प्राप्त झालेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्त्यास माहिती देता आली नाही. मात्र त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे दाखल केले व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे सुचनेनुसार अपीलकर्त्यास दिनां १०.२.२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याचे वकीलांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यांना फक्त ४४ पेजेसची माहिती प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले. तथापी कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयाकडून पाठविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन केले असता एकूण ६० पेजेसची माहिती पाठविण्यात आल्याचे सांगितले. मात्र अपीलकर्त्याचे वकीलांनी प्रत्यक्ष ४४ पेजेसची माहिती प्राप्त झाल्याचे आयोगापुढे सांगितले. म्हणून अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे आयोगासमोर खात्री केली असता अपीलकर्त्यास पुन्हा १६ पेजेसची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर विनामुल्य उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याचे वकीलांनी आयोगासमोर स्विकृत केली. सदरची माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

# **<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हें खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७६८/२०११ व अपील क्रमांक ७६९/२०११.

श्री. आनंद रामभाऊ चिमूरकर,
भानापेठ, वार्ड नं. २, पोलीस लाईन जवळ,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सुनिल निकम,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य),
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा,
कक्ष अधिकारी (सा. प्र. वि.),
जिल्हा परिषद, चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.८.२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.५.२०११ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २७.७.२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०.८.२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत वर नमुद केलेल्या दोन्ही अपीलांमध्ये अपीलकर्ता हे एकच असल्यामुळे व माहितीचा विषय हा एकच असल्यामुळे दोन्ही अपीलाची एकत्रित सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी यांचेतर्फे श्री. वनकर, अधिक्षक हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १५.१.२०११ रोजी व दिनांक २२.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अर्ज सादर करुन महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन

... २

परिपत्रक दिनांक १०.४.१९९० चे परिपत्रकाची अंमलबजावणी न करण्याबाबतचे अधिकार याबाबत माहिती मागितलेली होती. तथापी त्याना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे दिनांक १८.२.२०११ रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपील त्यांचे खारीज केल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी यांचे वतीने हजर असलेले सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दिनांक १५.१.२०११ चा व दिनांक २२.१.२०११ चा असे दोन्ही माहितीचे अर्ज त्यांचेकडे प्राप्त झालेले आहेत. अपीलकर्ता यांनी दोन्ही माहितीचे अर्जामध्ये महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक दिनांक १०.४.१९९० चे परिपत्रकाची अंमलबजावणी न करण्याबाबत माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क भरुन घेऊन दिनांक १८.२.२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली व सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत आयोगापुढे मान्य केले. मात्र प्रस्तुत प्रकरणात दिनांक १०.४.१९९० चे शासन परिपत्रकाची अंमलबजावणी संबंधात त्यांना माहिती मिळाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणून दिले की, प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्त्याने त्यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता सुनावणीचे वेळी हजर होते व त्यावेळी त्यांना अशी माहिती उपलब्ध करुन दिली की, शासनाकडील दिनांक २८.८.२००६ च्या पत्राप्रमाणे आपणास असे कळविलेले आहे की, शासन परिपत्रक दिनांक १०.४.१९९० च्या तरतुदी आपणास लागू होत नाही. अशी माहिती अपीलकर्त्यास सुनावणीचे वेळी देण्यात आली व प्रथम अपीलाचे निर्णयात असे नमुद केले की, अपीलकर्त्यास शासनाने दिनांक २८.८.२००६ च्या पत्राने अपीलकर्त्यास शासन परिपत्रक दिनांक १०.४.१९९० च्या तरतुदी लागू होत नाही असे कळविले असल्यामुळे पुनश्चः या संबंधात कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही असा प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आल्याचे सुनावणीचे वेळी आयोगापुढे सांगितले. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी

यांनी आयोगाचे असे ही निदर्शनास आणून दिले की, यापुर्वी देखील अपीलकर्त्याचे आयोगापुढे अशा विषयाबाबत अपील क्रमांक २०६/२०१०, अपील क्रमांक २०७/२०१०, अपील क्रमांक २०८/२०१०, अपील क्रमांक २०९/२०१०, अपील क्रमांक ७१२/२०१० व अपील क्रमांक ९२४/२०१० असे दाखल केलेले होते व सदरची सर्व अपीले आयोगाने यापुर्वी खारीज केलेले आहेत.

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास शासनाकडील परिपत्रक दिनांक १०.४.१९९० मधील तरतुदी लागू होत नाही अशी माहिती शासनाने अपीलकर्त्यास दिनांक २८.८.२००६ च्या पत्राने कळविलेली आहे. त्यामुळे सदरची माहिती शासनाकडून अपीलकर्त्यास प्राप्त झालेली असल्यामुळे पुन्हा जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास सदरची माहिती देणे अपेक्षित नाही. म्हणून अपीलकर्त्याची दोन्ही अपीले खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ७६८/२०११ व अपील क्रमांक ७६९/२०११ ही दोन्ही अपीले खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VDH/ ८७८- ८८० /३०.८.२०११